

# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

■ संपादक : गणेश पाटील ■

■ मुंबई ■ पुणे ■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सोलापुर ■ अहिल्यानगर

हॅलो प्रभात LIVE

Hello Prabhat Media

Print - Electronic - Social

सांगली-कोल्हापूर ■ वर्ष : ०६ ■ अंक : ३२३ ■ शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४


# जिल्ह्यात सत्तेचा खेळ पुन्हा रंगला?

## जि.प.अध्यक्षपदासाठी अफलातून व्यूहरचना / निवडी २० मार्चपूर्वी उरकण्याचा आदेश

**सांगली : गणेश पाटील**

सांगली जिल्हा परिषदेच्या सत्तेचा खेळ आता चांगलाच रंगला आहे, त्यापूर्वी पंचायत समिती सभापतींची निवड ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. पंचायत समितीचा सभापती हा जिल्हा परिषदेचा पदसिद्ध सदस्य असतो, त्यामुळेच पंचायत समिती सभापती निवड प्रथम उरकून घ्यावी लागणार आहे.

जिल्हा परिषद अध्यक्षपद निवड आणि पंचायती समिती सभापतीपदाची निवड २० मार्चपूर्वी उरकून घेण्याचा आदेश आल्यामुळे राजकीय हालचालींना वेग येणे स्वाभाविक आहे, फोडाफोडीचे राजकारण करण्यात महायुती यशस्वी ठरते की महाविकास आघाडी बाजी मारते यावर पुढील राजकीय गणित ठरणार आहे.

राज्यात भाजप ,राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट, आणि शिंदे सेना यांच्यात युती असली तरी सांगली जिल्ह्यात मात्र तशी स्थिती नाही, भाजपने सांगली जिल्ह्यात जिल्हा परिषदेची



निवडणूक स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेतलामुळे राष्ट्रवादी अजितदादा गटाचे सहा जिल्हा परिषद सदस्य आणि शिंदेसेनेचे सात सदस्य विजयी झाले. भारतीय जनता पक्ष आणि महायुतीतील घटक पक्ष यांच्यातच थेट लढत झाल्यामुळे आणि प्रचारात भाजप नेत्यांनी खालच्या पातळीवर येऊन टीका केल्याने राज्यात महायुतीत सत्तेत असलेल्या पक्षांचे सांगली जिल्ह्यात मात्र राजकीय गणित फिसकटले आहे. शिंदेसेनेने तर आमच्यावर कठोर टीका करणाऱ्यांच्या बरोबर आम्ही बसायचे का? असे म्हणत वेगळी चूल मांडण्याची तयारी सुरू केली, तर अजितदादा राष्ट्रवादी गटामध्येदेखील अशीच परिस्थिती आहे. त्यामुळे महायुतीला फाटा देऊन हे घटक पक्ष महाविकास आघाडी बरोबर जातात की काय अशी स्थिती निर्माण झाल्याचे चित्र दिसत असले तरी राजकीय निरीक्षकांच्या मते मात्र, तडजोड करून हे दोन्ही घटकपक्ष जिल्हा परिषदेच्या सत्तेत सहभागी होतील असा अंदाज व्यक्त केला जात आहे.



जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीचा चेंडू आता राज्य पातळीवरील नेत्यांच्या कोर्टात गेला आहे . राष्ट्रवादी अजितदादा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची सांगली जिल्ह्यातील राष्ट्रवादी अजितदादा गटाच्या नेत्यांनी मुंबईत भेट घेतली, परिस्थितीचे गांभिर्य समजावून सांगितले, तथापि थेट बोलता येत नाही म्हणून, सुनील तटकरे यांनी प्रथम गट नेत्याची निवड करा, मग पुढचे बघू असे म्हणत अप्रत्यक्ष सांगली जिल्ह्यातील नेत्यांवरच दबाव आणला. गटनेताच नसेल तर व्हिप लागू करता येणार नाही आणि तसे झालेच तर उदंड बैलासारखे कुणाच्याही शेतात करायला मोकळे अशी सदस्यांची अवस्था झाली असती, तथापि प्रथम गटनेत्याची निवड करा मग पुढचे राजकारण बघू असे म्हणत सुनील तटकरे यांनी पक्षाची भूमिका महायुती बरोबरच जाण्याची आहे, हेच अप्रत्यक्षरीत्या दाखवून दिल्याचे राजकीय जाणकारांमध्ये व्यक्त केले जात आहे.

आमदार सुहास बाबर यांनी महायुतीबरोबर जाण्यासंदर्भात अप्रत्यक्ष नकार दर्शवला होता तथापि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सांगली जिल्ह्यात महायुतीची साथ सोडतील असे वाटत नाही, त्यामुळेच आमदार सुहास बाबर यांना देखील या भूमिकेतूनच जिल्हा परिषद निवडणूक अध्यक्षपद निवडीला सामोरे जावे लागणार आहे. महायुतीतील घटक पक्षांच्या सदस्यांची बेरीज ३१ होते आणि बहुमताला इतक्याच सदस्यांची गरज आहे, तर महाविकास आघाडीकडे ३० सदस्य आहेत, त्यामुळे निवडणूक चुरशीची होणार आहे. या दृष्टिकोनातून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार जयंतराव पाटील यांनी पूर्ण ताकद लावली , तथापि राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर असल्याने सत्तेची साथ सोडण्याचे धाडस सांगली जिल्ह्यातील शिंदेसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट दाखवणार नाही अशी शक्यता राजकीय धुरीनांमधून व्यक्त होत आहे. तथापि राजकारणात काहीही होऊ शकते.

महायुतीची ३१ सदस्यांची जुळणी झाली तरी महापालिकेत ज्याप्रमाणे आमदार जयंतराव पाटील यांनी गेल्या टर्ममध्ये खेळी करून भाजपची सत्ता उलथवून टाकली होती, तसे यावेळी जिल्हा परिषदेत होऊ नये यासाठी भारतीय जनता पक्ष सावध आहे. त्या दृष्टिकोनातून आतापासूनच 'ऑपरेशन लोटस' सुरू करण्यात आले असून गुपचूप बैठकांना प्रारंभ झाल्याची चर्चा सुरू आहे.

## आतिश दांडेगावकर यांचा भाजपामध्ये प्रवेश

**मुंबई : हॅलो प्रभात**

शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते आणि माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांचे पुत्र आतिश दांडेगावकर यांनी त्यांच्या शेकडो समर्थकांसह गुरुवारी भारतीय जनता पार्टी मध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले. नवी मुंबई इथे झालेल्या पक्ष प्रवेश कार्यक्रमाला आमदार तान्हाजी मुटकुळे, प्रज्ञा सातव, जिल्हाध्यक्ष गजानन घुगे, किशोर देशमुख, माजी आमदार रामराव वडकुते, अंकुश आहेर, फुलाजीराव शिंदे, प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन आदी उपस्थित होते. सहकारक्षेत्रात काम करणारे उमदे नेतृत्व श्री. दांडेगावकर यांच्या भाजपाप्रवेशामुळे आता 'आतिश' पर्व सुरू झाले आहे या शब्दांत श्री. चव्हाण यांनी कौतुक केले. श्री.आतिश हे कपिश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत. यावेळी श्री.चव्हाण म्हणाले




की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देशाचा आणि महाराष्ट्राचा वेगाने विकास होत आहे. सर्व समाजघटकांचा विकास आणि प्रगती करण्याचा विडा त्यांनी उचलला आहे. या दोघांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वावर विश्वास ठेवून आज श्री.दांडेगावकर यांच्यासोबत त्यांच्या असंख्य समर्थकांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. या परिसरात पिकणा-या पिकांतून या परिसराचा विकास आणि रोजगार निर्मिती करण्यासाठी काय करता येईल ही जबाबदारी आता श्री. दांडेगावकर यांच्यावर सोपवत असल्याचेही ते म्हणाले. या सर्वांच्या प्रवेशामुळे हिंगोली जिल्ह्यात भाजपा संघटनेला अधिक बळकटी मिळेल. या सर्वांनी जो विश्वास भाजपावर ठेवला आहे त्या विश्वासास पात्र ठरू आणि सर्वांचा पक्षात उचित सन्मान राखला जाईल अशी ग्वाही श्री. चव्हाण यांनी दिली.

## महापौर सूर्यवंशी यांची छ.शिवाजी स्टेडियमला भेट



### मूलभूत सुविधांबाबत अधिकाऱ्यांना सूचना

**मिरज : हॅलो प्रभात**

सांगली महानगरपालिकेचे महापौर धीरज सूर्यवंशी यांनी छत्रपती शिवाजी स्टेडियम मिरज येथे प्रत्यक्ष भेट देऊन तेथील सुविधांचा आढावा घेतला. खेळाडू, प्रशिक्षक व स्थानिक नागरिकांशी संवाद साधून स्टेडियममधील अडचणी व आवश्यक सुधारणा जाणून घेतल्या.

यावेळी मैदानाची देखभाल, प्रेक्षक गॅलरीची दुरुस्ती, स्वच्छतागृहांची स्वच्छता व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रकाशयोजना तसेच सुरक्षाव्यवस्था याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. खेळाडूंना दर्जेदार सराव सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी तातडीने आवश्यक ती कामे हाती घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

महापौर सूर्यवंशी यांनी सांगितले की, शहरातील क्रीडांगणे ही युवकांच्या सर्वांगीण विकासाची केंद्रे आहेत. त्यामुळे स्टेडियममध्ये मूलभूत सुविधा दर्जेदार आणि सुरक्षित असणे आवश्यक आहे. प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून खेळाडूंना उत्तम वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने कार्य करावे, असे निर्देश त्यांनी दिले. या भेटीदरम्यान संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## लक्ष्मी मंदिर ते भारत सूतगिरणी रस्ता कामाची पाहणी

### काम जलदगतीने पूर्ण करण्याचे प्रशासनाला आदेश

**कुपवाड : हॅलो प्रभात**

शहरातील प्रमुख रस्त्यांपैकी एक असलेल्या लक्ष्मी मंदिर ते भारत सूतगिरणी दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाची आज उपमहापौर गजानन मगदूम यांनी पाहणी केली. हे काम गेल्या काही दिवसांपासून सुरू असून, प्रचंड वाहतूक असलेल्या या मार्गावर काम संथ गतीने सुरू असल्याने वाहनधारकांना मोठ्या प्रमाणात धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित रस्त्याचे काम जलदगतीने पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली होती. त्यानुसार उपमहापौर गजानन मगदुम यांनी प्रत्यक्ष



स्थळी भेट देऊन कामाचा आढावा घेतला. तसेच कामाचा दर्जा कायम राखून निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासन व कंत्राटदारांना दिल्या. रस्त्याचे काम लवकरच पूर्णत्वास आल्यास कुपवाड शहरातील मुख्य मार्गावरील वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शाखा अभियंता ऋतुराज यादव तसेच सामाजिक कार्यकर्ते मुदसर मुजावर उपस्थित होते.

## संक्षिप्त...



### कोल्हापुरात 'शॉर्टफिन डेव्हिल रे' मासा जप्त

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

उद्या कोल्हापुरात नवीन विषय... मासा... अशा आशयाची सोशल मीडियावर व्हायरल झालेली व्हिडीओ क्लिप आणि मिळालेल्या माहितीच्या आधारे वन विभागाच्या पथकाने फुलेवाडी रिंगरोडवरील 'फ्रेंडशिप फिश कंपनी' येथे छापा टाकून दुर्मीळ व संरक्षित 'शॉर्टफिन डेव्हिल रे' हा मृत मासा जप्त केला. मराठीत याला पाकट किंवा वागळ असे म्हणतात.

### 'गोकुळ'ला प्रारूप मतदारयादी सादर करण्याचा आदेश

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाला (गोकुळ) प्रारूप मतदारयादी सादर करण्याचा आदेश जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक राजकुमार पाटील यांनी दिला. तालुकानिहाय यादी सादर करण्यास २ मार्चपर्यंत मुदत दिली आहे. याबाबतचे पत्र निवडणूक अधिकारी पाटील यांनी 'गोकुळ'चे कार्यकारी संचालक योगेश गोडबोले यांना दिले. त्यानुसार प्रारूप मतदारयादी तयार करण्याच्या कामाला 'गोकुळ' कडून सुरुवात झाली आहे.

### साताऱ्यात ५० खाटांच्या आयुष रुग्णालयास मंजुरी

**सातारा : हॅलो प्रभात**

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या पाठपुराव्यामुळे सातारा येथे ५० खाटांच्या सर्व सुविधांनी युक्त जिल्हा एकात्मिक आयुष रुग्णालयास केंद्रीय आयुष मंत्रालयाकडून मंजुरी मिळाली आहे. या रुग्णालयामुळे जिल्ह्यातील रुग्णांना आयुर्वेद, होमिओपॅथी आणि युनानी पद्धतीचे उपचार स्थानिक पातळीवरच उपलब्ध होणार आहेत.

## बारामतीसाठी सुनेत्रा पवारांना बिनविरोध करण्याच्या हालचाली

**पुणे : हॅलो प्रभात**

बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार ठरला असल्याची माहिती समोर आली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बारामती पोटनिवडणूक लढणार असल्याची माहिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत पोटनिवडणूक लढण्यावर एकमत झाले आहे. बारामती विधानसभेची प्रारूप मतदार यादी १० मार्चला प्रसिद्ध झाल्यानंतर कोणत्याही क्षणी निवडणुकीची घोषणा होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निवडणूक बिनविरोध करण्यावर भर असणार आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीची तयारी निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. या विधानसभा मतदारसंघासाठी विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रम आयोगाने जाहीर केला असून १ जानेवारी २०२६ पर्यंत नाव नोंदविलेले मतदार पोटनिवडणुकीत मतदान करू शकणार आहेत. या मतदारसंघासाठी १० मार्चला अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे,

आगामी राज्यसभा निवडणुकीत पार्थ पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असतील, असा निर्णय पक्षाकडून घेण्यात आल्याची माहिती आहे. २६ फेब्रुवारीला होणाऱ्या राष्ट्रीय अध्यक्ष निवडीसंदर्भात आयोजित केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक आहे.

भारतीय संविधानानुसार कोणतीही व्यक्ती राज्याच्या विधिमंडळाची सदस्य नसतानाही मंत्री (उपमुख्यमंत्री किंवा मुख्यमंत्री) म्हणून नियुक्त होऊ शकते. मात्र, हे पद टिकवून ठेवण्यासाठी, शपथ घेतल्यापासून सलग सहा महिन्यांच्या आत त्या व्यक्तीला विधानसभा किंवा विधान परिषदेचे सदस्य होणे अनिवार्य असते. जर ते या कालावधीत सदस्य झाले नाहीत, तर त्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागतो. त्यामुळे आता बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीमध्ये सुनेत्रा पवार लढणार असल्याची माहिती आहे.

## 'इंडिया माईस जीवनगौरव' पुरस्काराने डॉ.संजय डी.पाटील सन्मानित

### उदयपूरच्या महाराणी निवृत्ती कुमारी मेवाड यांच्याहस्ते गौरव : सोहळ्यात हॉटेल सयाजीचाही गौरव

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

हॉस्पिटॅलिटी आणि पर्यटन क्षेत्रात अतुलनीय योगदान देणारे डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांना 'इंडिया माईस जीवनगौरव' पुरस्कारने सन्मानित करण्यात आले. पुणे येथे झालेल्या 'इंडिया माईस अवार्ड' सोहळ्यात उदयपुर राजघराण्याच्या निवृत्ती कुमारी मेवाड यांच्याहस्ते डॉ. संजय डी. पाटील यांना गौरविण्यात आले. त्याचबरोबर हॉटेल सयाजीचे व्यवस्थापकिय संचालक रौफ धनानी आणि कोल्हापूरमधील हॉटेल सयाजी यांनाही यावेळी सन्मानित करण्यात आले.

भारतातील मीटिंग्स, इन्सेंटिव्ह्स, कॉन्फरन्स आणि एक्झिबिशन पर्यटन क्षेत्रातील सर्वोच्च व्यासपीठ असलेल्या 'इंडिया माईस अवॉर्ड्स' सोहळा पुण्यात संपन्न झाला. यावेळी देशभरातील हॉटेल व्यावसायिक, कन्व्हेन्शन सेंटर्स, डेस्टिनेशन मॅनेजमेंट कंपन्या, एअरलाईन्स, पर्यटन मंडळे आणि इव्हेंट प्रोफेशनल्स यांची प्रमुख उपस्थिती होती. भारतातील पहिले आणि एकमेव 'माईस' पर्यटन मासिक असलेल्या 'ट्रॅव्हटूर माईस गाईड' कडून या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जाते. भारतातील पर्यटन उद्योगाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी आणि या क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानकर्त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी हे मासिक सलग १२ वर्षांपासून या पुरस्कारांचे आयोजन करत आहे.या




कार्यक्रमात कोल्हापूरमध्ये हॉटेल सयाजी या पंचतारांकित हॉटेलच्या माध्यमातून, खानपान, निवास, पर्यटन व आदरातिथ्य क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील यांचा जीवनगौरव पुरस्काराने गौरव करण्यात आला. उदयपूरच्या निवृत्ती कुमारी मेवाड यांच्या हस्ते डॉ. पाटील यानी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी आयोजक 'ट्रॅव्हटूर माईस गाईड'चे संपादक अरविंद शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्यात सयाजी हॉटेलचे एमडी रौफ धनानी यांना 'हॉटेलियर ऑफ द इयर' सन्मान प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर हॉस्पीटलिटी क्षेत्रात कोल्हापूरची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या सयाजी हॉटेलचा 'बेस्ट बिझनेस हॉटेल इन महाराष्ट्र' पुरस्काराने गौरव करण्यात आला.

डॉ. संजय डी. पाटील यांनी २०१५ मध्ये 'हॉटेल सयाजी'च्या माध्यमातून कोल्हापूरमध्ये जागतिक दर्जाच्या हॉस्पीटलिटी सुविधा उपलब्ध करून दिल्या. पर्यटन आणि उद्योग क्षेत्रातील वाढत्या गरजा ओळखून त्यांनी आधुनिक बँक्वेट हॉल्स, आलिशान निवास व्यवस्था, उत्तम रेस्टोरंटस आणि प्रशिक्षित कर्मचारीवर्ग यावर विशेष भर दिला. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन आणि स्वच्छता व सेवेमधील सातत्य यामुळे हॉटेल सयाजीने वेगळे स्थान निर्माण केले आहे. या योगदानाबद्दल हा गौरव करण्यात आला.

# संपादकीय

## लोकशाहीचा दुसरा कणा


विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाले असले, तरी त्याच्या पहिल्याच दिवशी चर्चेचा केंद्रबिंदू अर्थकारण न राहता विरोधी पक्षनेतेपदाच्या रिक्ततेभोवती फिरताना दिसला. दोन्ही सभागृहांत विरोधी पक्षनेते नसणे ही बाब नक्कीच संसदीय परंपरेला शोभणारी नाही; मात्र केवळ हे पद मिळाले म्हणजेच विरोधी पक्षाची भूमिका प्रभावी होईल, असे मानणेही तितकेच चुकीचे ठरेल. स्वातंत्र्यानंतर भारताने कोणत्या प्रकारची लोकशाही स्वीकारावी, यावर सखोल चर्चा झाली. थेट निर्णयप्रणालीची अध्यक्षीय पद्धत आणि संवादावर आधारित संसदीय पद्धत, या दोन पर्यायांपैकी भारताने जाणीवपूर्वक संसदीय लोकशाही स्वीकारली. या पद्धतीत संसद व विधिमंडळ सर्वोच्च असून सरकारला आपले निर्णय, योजना आणि खर्च यांना लोकप्रतिनिधींची मान्यता घ्यावीच लागते. वार्षिक अर्थसंकल्प असो वा एखादा कायदा, प्रत्येक गोष्ट चर्चेच्या कसोटीवरूनच पुढे जाते. या व्यवस्थेत प्रत्येक सदस्याला आपली भूमिका मांडण्याचा, जनहिताचे प्रश्न उपस्थित करण्याचा आणि सरकारला जाब विचारण्याचा घटनात्मक अधिकार आहे. अर्थसंकल्पातील एखाद्या बाबीवर असहमती दर्शविण्यासाठी एक रुपयाची कपात सूचना देण्याची तरतूद ही विरोधी पक्षाच्या ताकदीचे प्रतीक आहे. याच अधिकारांच्या बळावर सत्तेपासून दूर असूनही अनेक पक्ष वर्षानुवर्षे जनतेचा विश्वास मिळवत राहिले. संसदीय लोकशाहीचा गाभा असा की, हा रथ एका चाकावर चालू शकत नाही. सत्तापक्ष जितका महत्त्वाचा आहे, तितकाच विरोधी पक्षही. विरोधी पक्ष म्हणजे केवळ काही आमदारांचा समूह नव्हे; ती जनतेची भावना आहे. जाणीवपूर्वक दिलेल्या मतांचे ते प्रतिनिधित्व आहे. त्यामुळे विरोधी पक्षाची कोंडी करणे म्हणजे अप्रत्यक्षपणे जनभावनेची कोंडी करणे होय. आणि अशी कोंडी दीर्घकाळ टिकत नाही. ती कुठल्या ना कुठल्या मार्गाने व्यक्त होतेच. आजच्या परिस्थितीत विरोधी पक्षनेतेपदावरून सुरू असलेली रस्सीखेच हेच अधोरेखित करते. विधानसभेत हे पद मिळावे म्हणून सुरू असलेले प्रयत्न, तर विधान परिषदेत एका राजीनाम्यामुळे निर्माण झालेली अनिश्चितता. या सगळ्यातून एक गोष्ट स्पष्ट होते की दोन्ही सभागृहांत हे पद लवकर भरण्याची शक्यता धूसर आहे. मात्र, या पदाअभावी प्रभावी विरोध करता येणार नाही, असे मानण्याचे कारण नाही. इतिहास साक्षी आहे की इच्छाशक्ती, संयम आणि अभ्यास असेल, तर औपचारिक पदांशिवायही विरोधी पक्ष सरकारला जाब विचारू शकतो. पूर्वी विधिमंडळाचे कामकाज ही लोकांसाठी कुतूहलाची बाब होती. वर्तमानपत्रे, आकाशवाणी आणि संध्याकाळच्या बातम्यांनंतर होणारे समालोचन लोक लक्ष देऊन ऐकत. मागील अधिवेशनात विधान भवनात घडलेली कार्यकर्त्यांमधील झटापट ही या ऱ्हासाचीच लक्षणे दाखवते. अधिवेशन चालू असताना विधान भवनात उपस्थित असल्याचे फोटो समाजमाध्यमांवर टाकणे, ही प्रतिष्ठेची नव्हे तर फुशारकीची गोष्ट बनली आहे. त्याचा परिणाम असा झाला की, सामान्य नागरिकांसाठी खुले असलेले प्रवेश मार्ग बंद झाले आणि विधिमंडळ अधिकच दूर गेले. एकेकाळी सभागृहांच्या प्रेक्षक गॅलऱ्या भरून वाहत. नेत्यांचे भाषण, मुद्देसूद मांडणी आणि वादविवाद ऐकण्यासाठी लोक तासन्तास बसून राहत. आज ते दृश्य दुर्मिळ झाले आहे. लोकशाही जिवंत ठेवायची असेल, तर विधिमंडळ हे केवळ सत्तासंघर्षाचे नव्हे, तर जनतेच्या प्रश्नांचे व्यासपीठ राहिले पाहिजे. विरोधी पक्षनेतेपद असो वा नसो, लोकशाहीचा दुसरा कणा मजबूत ठेवण्याची जबाबदारी विरोधी पक्षावर आणि ती जपण्याची जबाबदारी सत्तापक्षावर आहे. कारण शेवटी, लोकशाही ही केवळ सत्तेची रचना नसून जनतेचा विश्वास आहे.

हॅलो प्रभात

**२७ फेब्रुवारी..! हा कवि कुलगुरु कुसुमाग्रज यांचा जन्मदिन 'मराठी राजभाषादिन' म्हणून साजरा केला जातो. प्राथमिक शिक्षणात इंग्रजी सक्तीचा विषय आहे पण मराठी सक्तीचा विषय नाही. कारण आज मराठी भाषेचा आग्रह धरणे हे संकुचित समजले जाते. म्हणून कवि कुसुमाग्रज सांगतात की, परभाषेत व्हा पारंगत ज्ञानसाधना करा तरी । माय मराठी मरो इकडे परकीचे पद चेपू नका ।। जेव्हा भाषा मरते त्यावेळी देशही मरतो, संस्कृतीही मरते.**

मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणून दर्जा मिळाला. पण आजकाल भरणाऱ्या मराठी साहित्य संमेलनात साहित्य कमी, राजकारण जास्त, मराठी भाषेची जोपासना कमी पण हेवे-दावे मात्र जास्त. मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा, लोकभाषा पण राज्याच्या प्रशासनात ज्या परीक्षा घेतल्या जातात त्यात हिंदी किंवा उर्दूचा पर्याय दिला जातो. खरे तर ती मराठीतूनच घेतली जावी. दक्षिणेत तामिळ भाषा ही अभिजात भाषा म्हणून मान्य झाली. महाराष्ट्रातही तसे व्हायला हवे. पाश्चिमात्य राष्ट्रात ९०% व्यवहार, शिक्षण व संशोधन त्यांच्या भाषेतून होते. पुस्तके ही त्यांच्या भाषेतच छापली जातात. असे महाराष्ट्रात व्हायला काय हरकत आहे?

२६ जानेवारी १९६५ रोजी राजभाषेचा कायदा झाला. त्यावर बऱ्याच विद्वानांनी मते व्यक्त केली. त्यातून एकच सूर निघाला होता की, विज्ञान प्रसार मातृभाषेतून म्हणजे मराठीतूनच झाला तर ते प्रभावी ठरेल. विज्ञान हा विचार करायला लावणारा विषय आहे. विद्यार्थ्यांचे कुतूहल जागृत करण्याचा तो एक मार्ग आहे. म्हणून विद्यार्थी ज्या भाषेत विचार करतो तीच भाषा विज्ञान शिक्षणाला व उच्च शिक्षणाला उपयुक्त ठरेल. इंग्रजीचे उच्चाटन केल्यास वैज्ञानिक प्रगती थांबेल असा काही लोकांचा गैरसमज झालेला दिसून येतो. जगातील कोणत्याही राष्ट्राने आपली भाषा सोडून इंग्रजी भाषेचा अवलंब केलेला नाही. त्यांचा कोठेही विकास थांबलेला नाही. उलट त्यांच्या भाषेत वैज्ञानिक क्षेत्र संपन्न झाले आहे. सुरुवातीला अडचणी आल्या पण त्यावर त्यांनी मात केली. मराठी भाषेतही ते शक्य आहे. प्राथमिक, माध्यमिक शिक्षण मराठीतूनच व्हावे, पदवीनंतर पुढे इंग्रजीचा वापर करावा. शक्यतो मराठीत उपलब्ध असलेली परिभाषा वापरली जावी. जेथे शक्य नाही तेथे इंग्रजी भाषा वापरावी. मराठीतून संज्ञा तयार कराव्या. इंग्रजीपेक्षा ती विद्यार्थ्यांना सोयीची वाटेल अशा प्रकारे इष्ट व आवश्यक गोष्ट कितीही अवघड वाटली तरी ती टाळण्यापेक्षा नेटाने पार पाडावी. इंग्रजीच्या जोडीला संशोधनासाठी जर्मन, फ्रेंच, रशियन भाषा शिकवली जाते. हे सर्व संशोधक, शास्त्रज्ञ मान्य करतात. परदेशात होणारे संशोधन समजावे म्हणून इंग्रजीची आवश्यकता आहे. भविष्यात




आपल्या मराठी भाषेतील संशोधन, वैज्ञानिक माहिती इतकी समृद्ध व्हावी की, परकीयांना मराठी भाषा शिकावी लागावी. त्यासाठी मराठी शब्द हे सोपे, सुटसुटीत व श्रवणीय असावेत व या शब्दांचा उपयोग शास्त्रीय लेखनात, संशोधनात केला जावा. ते बोजड असू नयेत. ते प्रपंचशील असावेत. इंग्रजांनी आपल्या भाषेत लॅटीन व ग्रीक शब्द वापरले आहेत. त्याप्रमाणे आपणाकडेही संस्कृतमधून शब्द वापरले जावेत.

मराठी माणसाला इंग्रजी येत नाही म्हणून तो मागे पडतो, असा एक गैरसमज समाजात पसरला आहे. पण त्यात काही तथ्य नाही. खरे तर आजकालच्या महाराष्ट्रीयन मान्यवरांचे शिक्षण हे मराठी भाषेतूनच झालेले आहे. पदवीपर्यंतचे सर्व शिक्षण मराठीत घेऊन पुढे संशोधन क्षेत्रात इंग्रजीचा उपयोग करताना त्यांना काहीही अडचणी आल्या नाहीत. त्यासाठी विद्यापीठांच्या स्तरावर याचा विचार व्हायला हवा. त्यामुळे ग्रामीण व सामान्य जनता विज्ञानयुगाच्या व संगणकयुगाच्या जवळ येणार आहे. त्यासाठी आपल्याकडील मान्यवर विज्ञान पदवीधरांनी, तंत्रज्ञांनी पुढाकार घ्यायला हवा. ते जसे जर्मन, फ्रेंच, जपानी, रशियन भाषांचे अभ्यास करून त्यात प्राविण्य मिळवितात त्याप्रमाणे मराठीतून शिकलेले विज्ञानाचे विद्यार्थी पुढे इंग्रजीचा अभ्यास करू शकतील. आज मराठीत अनेक पारिभाषिक कोश आहेत. त्यांचे एकत्रित संकलन करावे व ते सर्व शब्द विज्ञान लेखकांनी व शिक्षकांनी वापरावेत. म्हैसूर, कर्नाटक, अलाहाबाद, कलकत्ता, गुजरात इत्यादी विद्यापीठातून पदवी, पदवीपूर्व, पदव्युत्तर, संशोधन, प्रबंध लेखन तसेच अभियांत्रिकी शिक्षण स्थानिक भाषेतून पूर्ण करतात. त्यांच्या भाषेतच पुढे पीएच्. डी. ही करतात. जगाच्या पाठीवर कोठेही गेले तरी ते घरात त्यांच्या भाषेतच बोलतात. आज मुंबईत सर्व्हे केल्यास असे दिसून येईल की, बरेच महाराष्ट्रीयन लोक घरात इंग्रजीत बोलतात व आम्हाला मराठी समजत नाही असे अभिमानाने सांगतात. परप्रांतातून आलेले लोक महाराष्ट्रात हळुहळू स्थायिक झाले पण आपल्या पाल्यांना मराठी शाळेत घालायला नकार देतात. तेच तामिळनाडूमध्ये किंवा उत्तर प्रदेशात राहून तेथील तामिळ किंवा हिंदी भाषेत शिकायला नकार देण्याचे धाडस करत नाहीत. आजकाल मराठी माणसाला मराठीतून शिक्षण घेणं कमीपणाचे वाटत आहे. मराठी शाळेत मुलांना शिकवावे ही कल्पनाच मराठी माणसांना सहन होत नाही. इंग्रजी शाळेत घालणे हे आज प्रतिष्ठेचे झाले आहे व पुढे नोकरीसाठी परदेशात जाणे हेही प्रतिष्ठेचे झाले आहे तेव्हा महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातून विज्ञान, तंत्रज्ञानाचे शिक्षण मराठीतून सुरू करावे तरच पुढच्या काळात मराठी व मराठी माणूस टिकेल. अशी व्यवस्था झाली तरच खऱ्या अर्थाने कविवर्य कुसुमाग्रजांची जन्मतिथी साजरी करणे सार्थ ठरेल.

## एकही धुळवड कधी मिस केली नाही : दीप्ती केतकर

मुंबई : हॅलो प्रभात



'सन मराठी'वरील मी संसार माझा रेखिते या मालिकेतील अनुप्रिया भूमिकेमुळे चर्चेत असलेल्या दीप्ती केतकर यांनी होळीच्या आठवणी शेअर करताना प्रेक्षकांचे आभार मानले. मालिकेला मिळत असलेल्या प्रेमळ प्रतिसादाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांनी होळी हा केवळ रंगांचा नव्हे, तर मनातील नकारात्मक भावना जाळून टाकण्याचा सण असल्याचे सांगितले. लहानपणी धुलीवंदनाच्या तयारीसाठी एक दिवस आधीपासून रंग व पाण्याचे फुगे तयार करण्याची मजा आजही आठवत असल्याचे त्या म्हणाल्या. सासरीही त्या तितक्याच उत्साहात होळी साजरी करतात आणि प्रत्येक धुलीवंदनाला आवर्जून सुट्टी घेतात. आजपर्यंत एकही धुळवड मिस केलेली नाही, असे सांगत मालिकेतही होळी निमित्त मोठा ट्विस्ट पाहायला मिळणार असल्याचे त्यांनी सूचित केले.

## मनीषा दुधाळ यांना पंचायत समिती सभापतीपद द्यावे : माळप्पा कळ्ळी

करजगी : हॅलो प्रभात

डफळापूर जिल्हा परिषद गटातील बाज गणातून विजयी झालेल्या मनीषा दुधाळ यांना जत पंचायत समितीच्या सभापतीपदाची संधी द्यावी, अशी मागणी करजगी येथील ग्रामपंचायत सदस्य माळप्पा कळ्ळी (शेंडगे) यांनी केली आहे.

आ. गोपीचंद पडळकर यांचे समर्थक भाऊसो दुधाळ यांच्या पत्नी मनीषा यांनी नुकत्याच पार पडलेल्या पंचायत समिती निवडणुकीत दमदार विजय मिळवला. त्यांनी तब्बल ६,२६७ मते मिळवत काँग्रेसच्या उमेदवाराचा १,४१९ मतांनी पराभव केला.



मनीषा दुधाळ भाऊसो दुधाळ माळप्पा कळ्ळी

जत तालुक्यात एकूण ९ जिल्हा परिषद व १८ पंचायत समिती जागांसाठी निवडणुका पार पडल्या.

यामध्ये भाजपने १८ पैकी १२ जागा जिंकत घवघवीत यश संपादन केले असून जत पंचायत समितीवर एकहाती सत्ता प्रस्थापित केली आहे. यासंदर्भात बोलताना माळप्पा कळ्ळी म्हणाले, बाज गणात आ. गोपीचंद पडळकर यांच्यासोबत सामाजिक कार्यात कायम सक्रिय असलेले भाऊसो दुधाळ यांचा मोठा कार्यकर्ता वर्ग आहे.

पंचायत समिती गणात सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध राखत प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्याला सभापतीपदाची संधी मिळावी, ही अपेक्षा आहे. मनीषा दुधाळ यांना सभापतीपदाची जबाबदारी दिल्यास तालुक्यातील विकासकामांना गती मिळेल, असा विश्वासही कळ्ळी यांनी व्यक्त केला.

## ट्रायडंट ग्रूपची भरती मोहिमेसह विकसित भारत मिशनसोबत वाटचाल

कोल्हापूर : हॅलो प्रभात

ट्रायडंट लिमिटेड ही ट्रायडंट ग्रूपची मुख्य कंपनी आणि भारतातील एक आघाडीचा उद्योग समूह आहे. या कंपनीने आपल्या उत्पादन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर भरतीची प्रक्रिया जाहीर केली असून यातून ३००० हून अधिक कर्मयोगींना कामावर घेतले जाणार आहे. कापड उत्पादन क्षेत्रात कौशल्य विकासाला बळकटी आणि रोजगारनिर्मितीला चालना देण्याच्या राष्ट्रीय धोरणाला अनुसरून ही भरती प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. या घोषणेबद्दल ट्रायडंट ग्रूपच्या ग्रूप सीएचआरओ पूजा बी. लुथ्रा म्हणाल्या, ट्रायडंटमध्ये आमचा ठाम विश्वास आहे की भारताच्या उत्पादन क्षेत्रातील बदलांचा पाया प्रतिभावान मनुष्यबळात आहे. या मोठ्या प्रमाणावरील भरती प्रक्रिया मोहिमेद्वारे आम्ही आमच्या मनुष्यबळाला बळकटी देत आहोत आणि त्याचवेळी लवचिक आणि भविष्यासाठी सज्ज उत्पादन परिसंस्था निर्माण करण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टाला हातभार लावत आहोत. व्यवसायवृद्धीपलिकडे दीर्घकालीन करिअर जोपासणे, समुदायांना बळकटी देणे आणि जागतिक उत्पादन नेतृत्व बनण्याच्या भारताच्या प्रवासात अर्थपूर्ण साह्य देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत.

## ब्रह्मानंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची वसंतदादा साखर कारखान्यास क्षेत्रभेट



पलूस : हॅलो प्रभात

येथील ब्रह्मानंद विद्यालयातील १०० विद्यार्थ्यांनी वसंतदादा शेतकरी कारखाना येथे शैक्षणिक क्षेत्रभेट देत साखर उद्योगाची प्रत्यक्ष माहिती घेतली. उद्योगविश्वाचा जवळून परिचय व्हावा तसेच विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक दृष्टीकोन विकसित व्हावा, या उद्देशाने ही भेट आयोजित करण्यात आली. अमित माने व अर्जुन वंटे यांनी विद्यार्थ्यांना साखर उत्पादन प्रक्रियेतील विविध टप्पे तसेच आधुनिक तंत्रज्ञान यांची माहिती दिली. संभाजी खुडे यांनी कार्यप्रणालीबाबत मार्गदर्शन केले. या क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांना खा.विशाल पाटील यांची भेट घेण्याची संधी मिळाली. यावेळी शिक्षक संदीप कदम, प्रशांत कांबळे, प्राजक्ता शिंदे व गीतांजली मोरे उपस्थित होते. क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्राचा अनुभव मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.

## सर्वोत्तम एआय अनुभवासह सॅमसंग 'गॅलेक्सी एस२६' सिरीज लाँच

मुंबई : हॅलो प्रभात



सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सने आज गॅलेक्सी एस२६ सिरीज सादर केली. या सिरीजमध्ये उत्कृष्ट कार्यक्षमता, उद्योगातील आघाडीची कॅमेरा प्रणाली आणि दैनंदिन कामे अधिक सुलभ करणारे गॅलेक्सी एआय अनुभव दिले आहेत. सॅमसंगच्या तिसऱ्या पिढीतील एआय स्मार्टफोन म्हणून गॅलेक्सी एस२६, एस२६+ आणि एस२६ अल्ट्रा पार्श्वभूमीत जटिल कामे हाताळतात, ज्यामुळे वापरकर्ते केवळ परिणामांवर लक्ष केंद्रित करू शकतात. गॅलेक्सी एस२६ सिरीजमध्ये आम्ही एआय अनुभव अधिक सहज आणि नैसर्गिक बनवण्यावर भर दिला आहे. एआय शांतपणे पार्श्वभूमीत कार्य करत राहते, ज्यामुळे लोकांना त्यांच्या महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष देता येते, असे टीएम रोह, सीईओ, प्रेसिडेंट आणि हेड ऑफ डिव्हाइस एक्सपीरियन्स डिव्हिजन, सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स यांनी सांगितले.

# कोयना प्रकल्पग्रस्तांचे बेमुदत आंदोलन

### ६५ वर्षांनंतरही पुनर्वसन रखडले; जिल्हाधिकारी कार्यालयावर श्रमिक मुक्ती दलाचा मोर्चा

सातारा : हॅलो प्रभात

कोयना धरण प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन तब्बल ६० ते ६५ वर्षांनंतरही अपूर्ण असल्याच्या निषेधार्थ श्रमिक मुक्ती दलच्या वतीने सोमवारी सातारा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली बेमुदत ठिय्या आंदोलनास सुरुवात करण्यात आली आहे. आंदोलनकर्त्यांच्या माहितीनुसार, एकूण ९,८७६ प्रकल्पग्रस्त खातेदारांपैकी ४,२८९ जणांचे पुनर्वसन अद्याप झालेले नाही. त्यामध्ये २,८९५ खातेदारांना अजिबात जमीन



मिळालेली नसून १,३९४ खातेदारांना अंशतः जमीन वाटप झाले आहे. पर्यायी जमिनींसाठी पसंती घेऊनही प्रत्यक्ष वाटप प्रक्रिया ठप्प असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात १२ सप्टेंबर २०२५ रोजी विभागीय आयुक्तालयात तसेच २३ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबई येथे मदत व पुनर्वसन विभागाच्या उपसचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. सातारा जिल्हाधिकारी कार्यालय केंद्र मानून विविध जिल्ह्यांत कॅम्प लावून जमीन शोध मोहीम राबवण्याचा निर्णय झाला होता; मात्र त्याची अंमलबजावणी झालेली नाही, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

या पार्श्वभूमीवर कोयना धरण प्रकल्पग्रस्तांनी २३ फेब्रुवारी २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. प्रत्यक्ष जमीन वाटप सुरू होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. शासनाने तातडीने कालबद्ध कार्यक्रम जाहीर करून शंभर टक्के पुनर्वसन राबवावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

# ओमकार रानडे याची 'इंजिन कॅडेट' म्हणून निवड

### आर. के. मरीन करिअर अकॅडमीकडून शिष्यवृत्ती जाहीर

कराड : हॅलो प्रभात

सातारा येथील ओमकार रानडे याने मर्चंट नेव्ही क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत 'इंजिन कॅडेट' पद मिळवले आहे. कराडमधील मर्चंट नेव्ही प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या आर के मरीन करीअर अकादमीचा तो गुणवंत विद्यार्थी असून, ही माहिती अकादमीचे संचालक राहुलकुमार खडके यांनी दिली. ओमकारने माध्यमिक शिक्षण डी. जी. कॉलेज सातारा येथे पूर्ण केले. त्यानंतर मर्चंट नेव्हीमध्ये करिअर घडवण्याच्या उद्देशाने त्याने इंटरनॅशनल मेरीटाईम अकॅडमी, चेन्नई येथे कॅडेट प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.



समुद्रावरील साहसी जीवन, परदेश भ्रमंतीच्या संधी आणि आकर्षक वेतन यामुळे त्याने हे क्षेत्र निवडले. प्रशिक्षणाचा खर्च मोठा असल्याने सुरुवातीला आर्थिक अडचणी निर्माण झाल्या. ओमकारने आपली इच्छा आजी उज्वला गोडसे आणि आई आसावरी रानडे यांच्याशी बोलून दाखवली. मर्यादित उत्पन्न असतानाही दोघींनी कष्ट करण्याचा निर्धार करत त्याला प्रशिक्षणासाठी पाठवण्याचा ठाम निर्णय घेतला. वडिलांचा आधार नसतानाही त्यांच्या जिद्दीमुळे हे स्वप्न साकार झाले. दैनिकातील लेखातून अकादमीची माहिती मिळाल्यानंतर ओमकारने संपर्क साधला. प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून आवश्यक परीक्षा उत्तीर्ण केल्या व सीडीसी प्रमाणपत्र प्राप्त केले. अखेर त्याची 'इंजिन कॅडेट' म्हणून निवड झाली.

ओमकारच्या यशाबद्दल अकादमीकडून ५१ हजार रुपयांची शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. तसेच लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत त्याचा सत्कार समारंभ आयोजित केला जाणार असल्याचे राहुलकुमार खडके यांनी सांगितले.

## वर्ल्ड सस्टेनेबल डेव्हलपमेंट समिटच्या २५व्या पर्वाचे उद्घाटन

मुंबई : हॅलो प्रभात



द एनर्जी अँड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट चा वार्षिक प्रमुख उपक्रम वर्ल्ड सस्टेनेबल डेव्हलपमेंट समिट २०२६ च्या रौप्य महोत्सवी पर्वाचे औपचारिक उद्घाटन भारत सरकारचे पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंदर यादव यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या मुख्य भाषणात माननीय मंत्री यांनी समानता, स्थिरता आणि शाश्वत वाढीवर आधारित भारताच्या हवामान विषयक महत्त्वाकांक्षेला प्रकाशझोतात आणले. हवामान आणि विकास कार्यातील परिवर्तनीय अजेंडा पुढे नेण्यासाठी या परिषदेत जागतिक नेते, धोरणकर्ते, उद्योजक, संशोधक आणि नागरी संस्था एकत्र आल्या आहेत. 'परिवर्तन: शाश्वत विकासासाठी दृष्टीकोन, आवाज आणि मूल्ये' या मुख्य संकल्पनेखाली आयोजित डब्ल्यूएसडीएसचे हे २५वे एडिशन समिटच्या वारशातील महत्त्वाचा टप्पा आहे.

## एचडीएफसी बँकने नवे टेक आणि डिजिटल फॅक्टरीचे केले उद्घाटन

कोल्हापूर : हॅलो प्रभात



भारतातील खासगी क्षेत्रातील अग्रगण्य बँक एचडीएफसी बँकेने गुवाहाटीत आपले नवे टेक आणि डिजिटल फॅक्टरी सुरू केले आहे.

हे केंद्र प्रगत तंत्रज्ञान विकास, नवोन्मेष आणि प्रतिभा संवर्धनासाठी कार्य करणार असून, आसाममध्ये एआय, डिजिटल आणि सायबरसिक्युरिटी क्षेत्रातील कौशल्यवृद्धीला चालना देणार आहे. ही सुविधा आसाममधील पहिली तर राष्ट्रीय स्तरावर चौथी आहे. यापूर्वी बँकेच्या अशा सुविधा मुंबई, बेंगळुरू आणि गुरुग्राम येथे आहेत.

इमारतीचे उद्घाटन आसामचे मुख्यमंत्री डॉ. हिमंत बिस्वा सरमा यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी एचडीएफसी बँकेचे डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर कैझाद भरुचा, एचडीएफसी बँकेचे मुख्य माहिती अधिकारी रमेश लक्ष्मीनारायण, आसाम सरकारचे मान्यवर, सहभागी शैक्षणिक संस्थांचे सदस्य आणि एचडीएफसी बँकेचे अधिकारी उपस्थित होते.

## करण अदाणींनी गव्हर्नन्स, संरक्षण आणि वाढीच्या प्राधान्यक्रमांवर टाकला प्रकाश

नवी दिल्ली : हॅलो प्रभात न्यूज नेटवर्क

वेगाने विस्तार होत असताना राष्ट्रीय पायाभूत सुविधा प्राधान्यक्रम, संरक्षणाशी संबंधित परिसंस्था आणि अंतर्गत गव्हर्नन्स यावर लक्ष अधिक मजबूत करत असल्याचे करण अदाणी यांनी शनिवारी सांगितले. ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशन च्या प्लॅटिनम ज्युबिली निमित्त आयोजित संवाद सत्रात बोलताना, अदाणी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोनचे व्यवस्थापकीय संचालक आणि अदाणी सिमेंट चे संचालक असलेले अदाणी यांनी समूहाच्या विकसित होत असलेल्या कॅपिटल अलोकेशन स्ट्रॅटेजीबद्दल माहिती दिली.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६४१६ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक **हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली– ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे–४११०३० ■ **सांगली कार्यालय :** ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली – ४१६४१६
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर–४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ निवासी संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : 9011889001 / 9021651976

# शिलाई मशीन वाटपाचा कार्यक्रम भाजपने उधळून लावला

■ नेवरी ग्रामपंचायतीतील प्रकार: भाजपचे काँग्रेसला सडेतोड उत्तर




**देवराष्ट्रे-संदेश जाधव :** कडेगाव तालुक्यातील नेवरी गावात ग्रामपंचायतीच्या निधीतून महिलांना शिलाई मशीन वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मात्र हा कार्यक्रम ग्रामपंचायत पदाधिकारी व सदस्यांच्या हस्ते न होता, काँग्रेसच्या नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य जितेश कदम यांच्या हस्ते घेण्याचा प्रयत्न झाल्याने वाद निर्माण झाला. ग्रामपंचायतीच्या बैठकीत दोन्ही कार्यक्रम एकत्र घेण्यास भाजप च्या सदस्यांनी विरोध दर्शवला होता. शिलाई मशीन ग्रामपंचायत निधीतून दिल्या जात असल्याने वाटपाचा कार्यक्रम ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या हस्तेच व्हावा, अशी भाजपची भूमिका होती. मात्र काँग्रेसच्या एका अतिउत्साही नेत्याने बहुमताचा दावा करत विरोध डावलला. या पार्श्वभूमीवर गुरुवारी भाजप सदस्य व कार्यकर्त्यांनी शिलाई मशीन वाटप कार्यक्रमाला जोरदार विरोध करत तो उधळून लावला. त्यानंतर काँग्रेसचे युवा नेते जितेश कदम यांच्या सत्काराचा कार्यक्रम मात्र शांततेत पार पडला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### संत तुकाराम महाराज शिळा मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा उत्साहात

**पुणे : हॅलो प्रभात**

लोहगाव येथील जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या शिळा मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा १० व्या वर्धापन दिनानिमित्ताने शिळा मंदिर प्रतिष्ठान व समस्त ग्रामस्थ लोहगाव यांच्या वतीने हरिनाम सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला गुरुबाबा औसेकर महाराज याचे आशीर्वादानेव गुरुवर्य सद्गुरूनाथ माऊली महाराज वाळुंजकर यांच्या शुभहस्ते वीणा व गाथा पूजन करून लोहगावचे माजी सरपंच पांडुरंग खेसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरवात करण्यात आली.आठ दिवस चालणाऱ्या कार्यक्रमात गाथा पारायन व्यासपीठ चालक म्हणून हभप गोरक्षनाथ वर्पे महाराज हे होते. काकड आरती,गाथा पारायन ,महिला भजनी मंडळाचे भजन ,हरिपाठ ,कीर्तन , हरीजागर व दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कीर्तनकार वारकरी भुषण हभप गणेश महाराज खेडकर ,हभप मंगेश महाराज कदम ,हभप ज्ञानेश्वर महाराज वाबळे , हभप केशव महाराज पवार , हभप पांडुरंग शास्त्री शितोळे , औसा संस्थांचे पाचवे पिठाधिपती समर्थ सद्गुरु ह भ प श्री गुरुबाबा महाराज औसेकर, ह भ प आचार्य हरिदास महाराज पालवे शास्त्री, ह भ प गुरुवर्य पंडित महाराज क्षीरसागर यांच्या काल्याच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली यावेळी अरुण कोठावळे उद्धव महाराज शिंदे भाऊसाहेब धावडे सर आदिनाथ जी सटले गुरुजी वैशाली प्रकाश खांदवे, रामेश्वर सुपेकर राधाकृष्ण गरड गुरुजी यांनी हरिजागरामध्ये उत्साह वाढवला त्यांना शंकर महाराज इंगोले रामेश्वर महाराज सुपेकर, यशवंत महाराज खामकर ,तुकाराम पांचाळ, बळवंत पांचाळ ,हनुमंत साठे व विणेकरी राणू वाळुंज यांनी सहकार्य केले.शिळा मंदिर प्रतिष्ठानचे अध्यक्ष हभप अशोकराव खांदवे व सर्व सभासद यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तसेच समस्त लोहगाव ग्रामस्थ ,भजनी मंडळे व महिला भजनी मंडळ व कार्यकर्त्यांनी विशेष सहकार्य केले.

### पुणे जिल्ह्यात १,१५४ सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू

**पुणे : हॅलो प्रभात**

राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुन्हा सुरू करण्याचे आदेश राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने दिले आहेत. त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील एकूण 1 हजार 154 सहकारी संस्थांचा समावेश असल्याची माहिती राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणातून देण्यात आली. त्यामध्ये पुणे शहरातील प्रलंबित असलेल्या 343 सहकारी संस्था आणि पुणे ग्रामीण/जिल्ह्यातील 811 सहकारी संस्थांचा समावेश असल्याची माहिती प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी दिली. पुणे जिल्ह्यातील 'अ' वर्ग सहकारी संस्थांच्या प्रलंबित यादीनुसार पाच संस्थांचा समावेश आहे. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य केडरायझेशन को-ऑपरेटिव्ह सोसायटी (सदाशिव पेठ, पुणे), महाराष्ट्र राज्य महिला संस्थांचा महासंघ मर्यादित, द्वारा : महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे यांचा समावेश आहे.

# कोयना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत ५ मार्चला मंत्रालयात बैठक

## बेमुदत ठिय्या आंदोलन तात्पुरते स्थगित : डॉ.भारत पाटणकर

**सातारा : हॅलो प्रभात**

सूर्यकांत पाटणकर

महाराष्ट्र राज्याचे मदत पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली,सर्व संबंधित अधिकाऱ्यांसह व श्रमिक मुक्ती दलाच्या शिष्टमंडळासह ५ मार्च रोजी मंत्रालयात बैठक लावल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गेले चार दिवस सुरू असलेले बेमुदत ठिय्या आंदोलन तात्पुरते स्थगित केल्याचे श्रमिक मुक्ती दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर यांनी जाहीर केले. ते जिल्हाधिकारी कार्यालयालय येथे सुरू असलेल्या आंदोलन करणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या समोर बोलत होते. यावेळी संतोष गोटल, ऍड. शरद जांभळे, प्रकाश साळुंखे, किसन सुतार, आनंद सपकाळ, गुलाब काटे, मनोहर निकम, श्रीपती माने, पांडुरंग लाड, इंदूबाई थोरवडे यांनी आपल्या सरकार बाबत तीव्र भावना व्यक्त केल्या. डॉ.पाटणकर पुढे म्हणाले की, शिवाजी महाराजांनी ज्या बलाढ्य शत्रूला गनिमी काव्याने पराभूत केले, त्याचप्रमाणे आम्ही सुध्दा तोच गनिमी कावा वापरून लढा दिला आहे, आम्ही आजपर्यंत बोगस प्रकल्पग्रस्त आहेत म्हणत होतो, ते आजच्या शासनाच्या दप्तरी नोंद झाले असून त्याची आकडेवारी आम्हाला मिळाली आहे, आणि खऱ्या धरणग्रस्तांचे पुनर्वसन शंभर टक्के होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे हाच आजचा विजय आहे.



ते पुढे म्हणाले की, कोयना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत जी भिंत आडवी येत होती, तिचा पायाच आज या आंदोलनाने खिळखिळा केला असून, पुढील काळात ही भिंत आपोआपच ढासळून पडेल आणि लवकरात लवकर कोयना धरणग्रस्तांना जमीन वाटप सुरू करण्याचा मार्ग मोकळा होईल. ही लढाई आम्ही जिंकली असून यामध्ये काही दगा फटका झाला किंवा सरकारने टाळाटाळ केली तर पुढील काळात जो लढा होईल तो सरकारला पूर्ण नामोहरम केल्या शिवाय राहणार नाही असा इशाराही डॉ. पाटणकर यांनी यावेळी दिला.

यावेळी गणेश भिसे, संदीप कांबळे, धम्मरक्षित रणदिवे, स्वाती उथळे, गणेश वाघमारे, एकनाथ लाड, दाजी शेलार, रामभाऊ शेलार, ज्ञानबा भोसले, किसन जाधव, प्रभाकर चव्हाण, कृष्णाबाई थोरवडे, यांच्यासह मोठ्या संख्येने कोयना धरणग्रस्त स्त्री पुरुष उपस्थित होते.

# डाळज येथील अपघातात आई व बाळासह तिघांचा जागीच मृत्यू

**भिगवण : हॅलो प्रभात**

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील डाळज नंबर २ (ता. इंदापूर) येथे गुरुवारी (दि,२६) रोजी सायंकाळच्या सुमारास पुणे लेनवर रस्त्याच्या कडेला पंक्चर काढण्यासाठी उभ्या असलेल्या टेम्पोला पाठीमागून इको चारचाकी गाडीची जोरदार धडक बसून भीषण अपघात झाला यामध्ये दोन महिला आणि एका चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला तर तिघे जखमी झाले आहेत. या अपघातात आदिती अमर हातेकर (वय २५) व त्यांच्या मुलगा जय अमर हातेकर (वय २) आणि सखुबाई ईश्वर गेजगे (वय ६०, सर्व राहणार सांगोला, जिल्हा सोलापूर) हे अपघातात जागीच ठार झाले. तर इको गाडीवरील चालक कबीरदास ईश्वर गेजगे (वय ५०, रा. पाटस ता. दौंड) हे गंभीर जखमी झालेले आहेत. तर त्यांच्या पत्नी स्वाती कबीरदास गेजगे (वय ३४) व मुलगी समृद्धी कबीरदास गेजगे (वय १०) हे किरकोळ जखमी झाले असून गुन्हा दाखल करण्यात येत असल्याची माहिती भिगवण पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे यांनी दिली. हा अपघात आयशर टेम्पो (एमएच १३ सीयू ५१६३) याचा टायर पंचर झाल्याने धोकादायक स्थितीत अर्धवट हायवे रोडच्या साईडला उभा होता.

# जयहिंद सेनेच्यावतीने दुय्यम निबंधकांना विविध मागण्यांचे निवेदन

*मागण्या मान्य न झाल्यास कार्यालयाला टाळे ठोकणार ; चंदनदादा चव्हाण*

**कवठेमहंकाळ : हॅलो प्रभात**

जयहिंद सेना महाराष्ट्र राज्य या पक्षाच्या वतीने आपल्या विविध मागण्यांचे निवेदन दुय्यम निबंधक श्रेणी १ चे विनायक सोलनकर यांना देण्यात आले.यावेळी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष चंदनदादा चव्हाणसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या दिलेल्या निवेदनात असे म्हणण्यात आले आहे की जनतेच्या माहितीसाठी तुकडेबंदी कायद्याची एसओपी अर्थात नियमावली कार्यालयाच्या बाहेर फलकावर तात्काळ लावण्यात यावी,कार्यालयाच्या कामात पारदर्शकता येण्यासाठी तात्काळ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावेत,कायद्याची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रशासनाने सक्रिय पाऊले उचलावीत,कार्यालयात खासगी दलालांचा वावर तात्काळ थांबवावा,दस्तऐवजाच्या टोकनसाठी २०० रुपये फी



आकारुनही त्याची पावती दिली जात नाही ते तात्काळ थाबवावे. यासारख्या विविध मागण्यांचा यामध्ये समावेश आहे.या मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास सदर कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी जयहिंद सेनेचे पक्षप्रमुख चंदनदादा चव्हाण, जयहिंद गुंठेवारी सेनेचे प्रदेशाध्यक्ष रामदास सावंत, तालुकाध्यक्ष आदर्श नलवडे, शहरप्रमुख सुनील कांबळे,मिरज शहर प्रमुख हुसेन शेख,मोहम्मद शिंदे,गौरव भोसलेसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कारागृहासाठी स्वतंत्र रुग्णालय उभारावे : आ. बापूसाहेब पठारे

**पुणे : हॅलो प्रभात**

येरवडा येथील कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेबाबत आमदार बापूसाहेब पठारे यांनी सभागृहात लक्षवेधीच्या माध्यमातून महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. येरवडा कारागृहातील आरोपींना वैद्यकीय तपासणीसाठी ससून रुग्णालय येथे नेण्यात येते. या प्रक्रियेदरम्यान काही वेळा आरोपी पळून जाण्याच्या घटना घडल्याने सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.या पार्श्वभूमीवर येरवडा कारागृह परिसरातच स्वतंत्र, विशेष सुरक्षा असलेले रुग्णालय सुरू करण्यात यावे, अशी मागणी आमदार पठारे यांनी केली. मागील २०२५ च्या अधिवेशनातही त्यांनी हीच मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे



केली होती, याचीही त्यांनी सभागृहात आठवण करून दिली. कारागृहासमोरच न्यायालयाचे बांधकाम सुरू असल्यामुळे या संपूर्ण परिसरात वैद्यकीय सुविधा उपलब्ध झाल्यास आरोपींना बाहेर नेण्याची आवश्यकता कमी होईल. परिणामी सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत होईल आणि

**येरवडा कारागृह परिसरातच स्वतंत्र आणि सुसज्ज विशेष रुग्णालय उभारणे ही काळाची गरज आहे. यामुळे आरोपींना बाहेर नेण्याची गरज कमी होईल, पोलीस यंत्रणेवरील ताण कमी होईल आणि सुरक्षेची पातळी अधिक भक्कम होईल. पुणेकरांच्या सुरक्षिततेशी तडजोड केली जाणार नाही. तसेच शहरात वाढत चाललेल्या अमली पदार्थांच्या समस्येवर कठोर कारवाईसाठी शासनाने विशेष मोहीम राबवावी.**

**- आ.बापूसाहेब पठारे**

पोलीस यंत्रणेवरील ताणही मोठ्या प्रमाणात कमी होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच पुणे शहरात वाढत चाललेल्या अमली पदार्थांच्या (ड्रग्स) समस्येवर कठोर आणि प्रभावी उपाययोजना राबविण्याची मागणीही त्यांनी सभागृहात केली. युवकांमध्ये वाढणारे व्यसन आणि त्यातून निर्माण होणारी गुन्हेगारी रोखण्यासाठी विशेष मोहिम हाती घ्यावी, असेही पठारे यांनी सांगितेल.यावर उत्तर देताना राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले की, येरवडा कारागृहात आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच ससून रुग्णालय परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने स्वतंत्र पोलीस स्टेशन उभारण्याची कार्यवाहीही प्रगतिपथावर आहे.

# पुढील ३० दिवसांच्या आत दंड न भरल्यास लायसन्स रद्द

**पुणे : हॅलो प्रभात**

पुण्यात वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या चालकांवर वाहतूक पोलिसांनीकारवाईचा बडगा उगारला आहे. जे नागरिक वाहतुकीच्या दंडाचे चलन पुढील ३० दिवसाच्या आत भरणार नाहीत. अशा वाहनचालकांचे लायसन्स रद्द करण्याचा निर्णय वाहतूक पोलीस विभागाने घेतला आहे. पुणे शहर वाहतूक पोलीस विभागाचे हिम्मत जाधव यांनी एक्सच्या माध्यमातून अशी माहिती दिली आहे. दि. २६ फेब्रुवारी २०२६ पासून पुढील ३० दिवसांसाठी एक विशेष चलन भरणा मोहिम आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये २६ फेब्रुवारी ते १ मार्च दरम्यान नागरिकांना आपल्या नंबरवर MHPECH-G या अधिकृत शॉर्टकोडद्वारे येणाऱ्या एसएमएस अनुसार आपल्या वाहनांवरील दंड भरावा ही विनंती जाधव यांनी केली आहे. पुण्यात अनेक चालक नियम मोडून वाहन चालवताना दिसून येत आहेत. त्यामुळे सीसीटीव्हीच्या माध्यमातून वाहनावर दंड आकारले जात आहेत. तसेच पोलीस तपासणीतही अनेक वाहनांवर ऑनलाईन दंड आकारले जात आहेत. ते दंड वेळेत वाहनचालक भरत नाहीत. आता यावर उपाय म्हणून वाहतूक पोलिसांनी नागरिकांना ३० दिवसांची मुदत दिली आहे. ही मुदत संपण्याच्या आत दंड न भरल्यास थेट लायसन्स रद्द करणार असल्याचे सांगितले आहे.

# घोडावत इन्स्टिट्यूटमध्ये 'इनो क्वेस्ट २के२६' चे आयोजन

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

अतिग्रे येथील संजय घोडावत इन्स्टिट्यूट मध्ये "इनो क्वेस्ट २के२६" नाविन्यपूर्ण कल्पना, प्रकल्प प्रदर्शनाचे आयोजन सोमवार, २ मार्च २०२६ रोजी करण्यात आले आहे. संस्थेच्या 'संस्थात्मक नवोपक्रम परिषदे'च्या (आयआयसी) पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना, संशोधनवृत्ती आणि तांत्रिक कौशल्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या प्रदर्शनात महाराष्ट्र राज्यातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी आपले अभिनव प्रकल्प आणि कल्पना सादर करणार आहेत. उद्योगाभिमुख विचारसरणी, नवउद्योजकता संस्कृती आणि नवोपक्रमांना चालना देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे इन्स्टिट्यूट चे संचालक डॉ. विराट गिरी यांनी सांगितले. स्पर्धांमध्ये 'इनोव्हाट्रिक्स', 'आयडीया पिचिंग स्पर्धा', 'टेक्नोव्हर्स टेक-पेस्ट', 'पोस्टर एक्स प्रो' आणि 'टेक रोबस्टा' या प्रमुख विभागांचा समावेश आहे. 'इनोव्हाट्रिक्स' अंतर्गत 'सर्किट्रिक्स' आणि 'इनोव्हेटर्स अरेना' होणार असून, एक किंवा दोन सदस्यांच्या गटांना सहभाग घेता येणार आहे. 'आयडीया पिचिंग' स्पर्धेत समस्या मांडणी, प्रस्तावित उपाययोजना, लक्षित बाजारपेठ, उत्पन्न मॉडेल तसेच नाविन्य आणि विस्तारक्षमता यांचा समावेश असलेले सादरीकरण अपेक्षित आहे. या स्पर्धेत कमाल चार सदस्यांच्या गटांना सहभाग देता येणार आहे.

टेक्नोव्हर्स टेक-पेस्ट' अंतर्गत ग्रँड प्रिक्स ऑफ कोड, ब्लाइंड कोडिंग अरेना, पिक्सेल फिक्स, स्क्विड हंट, ई-स्पोर्ट्स (बीएमआय), ई-स्पोर्ट्स (फ्री फायर) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. पोस्टर एक्स प्रो' मध्ये सस्टेनेबल अँड ग्रीन कन्स्ट्रक्शन, इंडस्ट्री 4.0 अँड ऑटोमेशन, 5जी कमुनिकेशन सिस्टीम, वायरलेस कम्युनिकेशन: फ्युचर नेटवर्क आर्किटेक्चर, आर्टिफिशियल इंटीजिलेन्स आणि स्मार्ट सिटी या विषयांवर सादरीकरण होणार आहे. 'टेक रोबस्टा' अंतर्गत वळणदार मार्ग, गतीरोधक, बोगदे आणि उतार असलेल्या मार्गावर यंत्रमानव शर्यत आयोजित करण्यात आली असून, दोन सदस्यांच्या गटांना सहभाग घेता येणार आहे. अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी संबंधित विद्यार्थी समन्वयकांशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमास संजय घोडावत विद्यापीठाचे चेअरमन संजय घोडावत विश्वस्त विनायक भोसले यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# आत्मा मालिकचा मंगेश कदम ऑलिंपियाड चॅम्पियन




**कोपरगाव : हॅलो प्रभात**

आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुल अंतर्गत सेमी इंग्लिश मीडियम गुरुकुलातील विद्यार्थी मंगेश कदम याने सिल्व्हर झोन ऑलिंपियाड फाउंडेशन आयोजित आंतरराष्ट्रीय तर्क व अभियोग्यता ऑलिंपियाड परीक्षेत आंतरराष्ट्रीय स्तरावर द्वितीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. या परीक्षेत दरवर्षी सीबीएसई व राज्य मंडळाच्या इंग्रजी माध्यम शाळांचे वर्चस्व असते. मात्र यंदा आत्मा मालिकच्या सेमी इंग्लिश मीडियम विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर यश मिळवत संकुलाचा नावलौकिक वाढविला, अशी माहिती प्राचार्य निरंजन डांगे यांनी दिली. या परीक्षेत एका विद्यार्थ्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर, तर सुजितकुमार गोल्हार याने राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवला. तसेच पाच विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक, तीन विद्यार्थ्यांनी रौप्यपदक, चार विद्यार्थ्यांनी कांस्यपदक, तर २१ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले. सुवर्णपदक विजेते विद्यार्थी श्रेयष धावडे, कृष्णा धुमाळ, दर्शन गिरासे, प्रणव बादडे व ऋतुराज कारंडे हे आहेत. रौप्यपदक विजेते सिद्धार्थ साळवी, श्रेयष भवर व कृष्णा पाटील, तर कांस्यपदक विजेते साईराज गोरडे, श्रेयष नलावडे, युवराज राजपूत व घनश्याम ढेपे यांचा समावेश आहे.

# सातारा जि. प. अध्यक्ष निवडीला २० मार्चची डेडलाईन

## ग्रामविकास मंत्रालयाचा फतवा : महायुतीला समीकरणे जुळवावी लागणार

**सातारा : हॅलो प्रभात**

सातारा जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सभापती निवडीसाठी ग्रामविकास मंत्रालयाकडून फतवा जाहीर झाला असून 20 मार्चपूर्वी या निवडी केल्या जाव्यात असे परिपत्रक ग्रामविकास मंत्रालयाचे प्रमुख सचिव बा .म .आसोले यांनी काढले आहे .त्यामुळे महायुतीचे घटक पक्ष असणाऱ्या सातारा जिल्ह्यातील वरिष्ठ नेत्यांना तातडीने राजकीय समीकरणे जुळवावी लागणार आहेत .रायगड जिल्ह्यामध्ये भाजप व राष्ट्रवादी यांनी युती करत सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या शिवसेना शिंदे गटाला विरोधी बाकावर बसवले आहे .रायगडचा तिढा सुटला तरी सातारा जिल्ह्यातील महायुतीचा तिढा सुटलेला नाही .शिवसेना व राष्ट्रवादी यांचे सर्व जिल्हा परिषद सदस्य हे महाराष्ट्राच्या बाहेर सहलीवर असून कोणताही दगा फटका होऊ नये यासाठी काळजी घेतली जात आहे .सार्वजनिक




बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले हे सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सहभागी असले तरी मुंबईतून महायुतीतील वरिष्ठांशी बोलून सातारा जिल्ह्याचे डॅमेज कंट्रोल कसे करता येईल यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत .या सर्व प्रकरणांमध्ये आता शिवसेनेचे प्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भूमिका महत्त्वाची आहे .भारतीय जनता पार्टीने रायगड जिल्ह्यामध्ये शिवसेनेला राजकीय धोबी पछाड दिल्याने त्याचा परिणाम सातारा जिल्ह्यात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे .दरे येथील मुक्कामी एकनाथ शिंदे यांनी महायुतीच्या निर्णयाप्रमाणे सर्वकाही होईल असे संकेत दिले होते मात्र भाजपने थेट विरोधात भूमिका रायगड मध्ये घेतल्याने साताऱ्यात त्याचा वचपाशिवसेना व राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्या एकीकरणातून काढला जाणार का याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे .

ग्रामविकास मंत्रालयाने जिल्हा परिषद अध्यक्ष व पंचायत समितीच्या सभापती निवडीसाठी परिपत्रक जाहीर केले आहे या परिपत्रकानुसार 20 मार्चपूर्वी सभापती व अध्यक्ष पदाच्या निवडी करावयाच्या आहेत .सहलीवर गेलेले शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे सदस्य येत्या पाच मार्च पर्यंत पुन्हा साताऱ्यात परत येतील अशी माहिती समोर येत आहे .6 मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे त्यानंतर पालकमंत्री शंभूराजे देसाई व मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या माध्यमातून सत्तेचा निर्णय घेतला जाणार का याची राजकीय वर्तुळामध्ये प्रचंड उत्सुकता आहे .सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी जोरदार राजकीय मोर्चे बांधणी केली आहे महायुती की भाजपला वगळून सत्ता समीकरणे होणार याबाबत अद्याप सस्पेन्स कायम असून रायगडचा ठरलं पण अजून साताऱ्याचा ठरेना असे म्हणण्याची वेळ आली आहे .

# जि.प.शाळा कापूसखेड येथे किचन शेडचे उद्घाटन

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**



जिल्हा परिषद शाळा कापूसखेड नंबर २ मध्ये २४ फेब्रुवारी २०२६ रोजी किचन शेड, R.O. वॉटर यंत्रणा आणि इमारतीच्या ग्रीलसारख्या सुविधांचे उद्घाटन मोठ्या उत्साहात झाले. उद्घाटन प्रमुख पाहुणे पंडित प्रदीप तुकाराम पाटील होते. उद्घाटन समारंभात सरपंच निवृत्ती माळी, साखराळे केंद्राचे केंद्रप्रमुख पोपट जाधव, शाळा समिती अध्यक्ष दीपाली धुमाळे, उपाध्यक्ष प्रशांत माळी, शिक्षण तज्ज्ञ सदस्य माणिक पाटील, व्यवस्थापन समिती सदस्य दिलीप जाधव, गजानन माळी, संदीप खराडे, तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका आणि शिक्षक वृंद उपस्थित होते. पंचायत समिती सदस्य प्रदीप पाटील यांनी उद्घाटनानंतर सर्व वर्गांची पाहणी केली आणि विद्यार्थ्यांच्या कामाचे कौतुक केले. विशेषतः पोवाडा स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवलेल्या तिसऱ्या इयत्तेतील विद्यार्थिनींचे अभिनंदन करण्यात आले.

# ईश्वरपूरमध्ये रस्त्यांवर झुडपांचे साम्राज्य; प्रशासनाच्या दुर्लक्षाविरोधात संताप

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

शहरातील अनेक भागांतील रस्त्यांवर झुडपांचे साम्राज्य पसरल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. उपनगरांतील रस्त्यांवर झाडांच्या फांद्या रस्त्यावर झुकल्यामुळे काही ठिकाणी रस्ते दिसेनासे झाले असून वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते अमीर हवलदार यांनी प्रशासनाचे लक्ष वेधत “रस्ता देता का ओ रस्ता रस्त्यावरची झुडपे तरी काढा” अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. अनेक महिन्यांपासून नागरिकांनी तक्रारी करूनही नगरपालिका प्रशासन, स्वच्छता अधिकारी व



संबंधित कर्मचारी याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

ईश्वरपूर हे ईश्वरपूर शहर वाळवा तालुक्याचे प्रमुख ठिकाण असल्याने परिसरातील वाडी-वस्त्यांमधील नागरिक शहरात स्थलांतरित होत आहेत. परिणामी लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत आहे. शहरात पार्किंगची सोय नसल्याने वाहतुकीचा प्रश्नही तीव्र झाला आहे. अशातच उपनगरांतील रस्त्यांवरील झुडपांमुळे परिस्थिती अधिकच बिकट बनली आहे. नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीनंतर जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली सत्तास्थापना झाली असून विविध विभागांच्या सभापतींची निवडही करण्यात आली आहे. मात्र, संबंधित सभापती स्वतःच्या प्रभागापुरतेच मर्यादित राहिल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. शहर व उपनगरांतील नागरिकांना विविध समस्यांच्या छायेखाली दैनंदिन जीवन व्यतीत करावे लागत असून प्रशासनाने तातडीने रस्त्यांवरील झुडपे हटवून मूलभूत सुविधांकडे लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

> उपनगरातील रस्त्यालगत असणाऱ्या झुडप्यांमुळे रस्ते दिसेनासे झाले आहेत. सभापती त्यांच्या प्रभागात मग्न आहेत. तात्काळ झुडपे काढावीत अन्यथा नगरपालिकेच्या दालनात झुडपे आणून टाकू.
>
> **अमीर हवलदार,**
> **सामाजिक कार्यकर्ते**

# आरोग्य विभागाच्या कामकाजाचा मंगेश चव्हाण यांनी घेतला आढावा

## मोकाट कुत्रे व डास निर्मूलन मोहिमेची तपासणी

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक आरोग्य सेवा, स्वच्छता व्यवस्था आणि वाढत्या नागरी समस्यांच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते मंगेश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत आरोग्य विभागाची विशेष आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीत शहरातील मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव, त्यांच्या निर्बीजकरण मोहिमेची सद्यस्थिती तसेच विविध भागांत सुरू असलेल्या डास निर्मूलनासाठी औषध फवारणीच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींची दखल घेत या मोहिमा अधिक



**आरोग्य यंत्रणेला क्षेत्रीय पातळीवर सक्रिय राहण्याच्या सूचना**

प्रभावीपणे राबवाव्यात, अशा सूचना देण्यात आल्या.

यावेळी महापालिका उपायुक्त (आरोग्य व स्वच्छता), मुख्य स्वच्छता अधिकारी, स्वच्छता अधिकारी तसेच सर्व प्रभागांचे स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते. आरोग्य यंत्रणेने क्षेत्रीय पातळीवर अधिक सक्रिय राहून प्रतिबंधात्मक उपाययोजना काटेकोरपणे राबवाव्यात, असे निर्देश विरोधी पक्षनेते चव्हाण यांनी दिले.

# विक्रमसिंह सावंत यांनी बेंगळुरूमध्ये कर्नाटक मंत्र्यांची घेतली भेट

## सीमाभागातील कन्नड भाषिक नागरिकांच्या मांडल्या समस्या

**जत : हॅलो प्रभात**

जत तालुक्याचे माजी आमदार विक्रमसिंह बाळासाहेब सावंत यांनी बेंगळुरू येथे कर्नाटक राज्याचे कायदा, संसदीय कार्य, पर्यटन व सीमा प्रभारी मंत्री एच. के. पाटील यांची भेट घेऊन महाराष्ट्रकर्नाटक सीमाभागातील कन्नड भाषिक नागरिकांच्या दीर्घकालीन समस्यांबाबत सविस्तर निवेदन सादर केले.

भेटीदरम्यान कर्नाटक राज्याचे वरिष्ठ शासकीय अधिकारी आणि सीमा संबंधित प्रशासकीय



यंत्रणेमधील अधिकारी उपस्थित होते. बैठकीत सीमाभागातील नागरिकांना भेडसावत असलेल्या विविध प्रश्नांचा सखोल आढावा घेण्यात आला.

महाराष्ट्रातील जत, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, मंगळवेढा, कोल्हापूर, उमरगा व इतर भागांमध्ये वास्तव्यास असलेले कन्नड भाषिक नागरिक अनेक दशकांपासून शासकीय योजनांपासून वंचित राहत आहेत. सीमाभागातील विद्यार्थ्यांना मातृभाषेत शिक्षणाच्या सुविधा मर्यादित आहेत, रोजगाराच्या संधी, शेतीसाठी सिंचन, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा आणि दळणवळण सुविधा अपुरी असल्यामुळे नागरिकांचे जीवन कठीण झाले आहे. माजी आमदार सावंत यांनी या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी महत्त्वपूर्ण मागण्या मंत्री महोदयांसमोर मांडल्या. सीमाभागातील नागरिकांच्या हक्कांसाठी व विकासासाठी हा प्रयत्न महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असून, प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून या प्रश्नांना लवकरच न्याय मिळेल, अशी अपेक्षा विक्रमसिंह सावंत यांनी व्यक्त केली.

# ‘राजारामबापू’ साखराळे युनिटच्या गळीत हंगामाची सांगता

## ६.८१ लाख मेट्रीक टन उसाचे गाळप

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्यांच्या साखराळे युनिट मध्ये सन २०२५- २६ चा गळीत हंगामाची सांगता कारखान्याच्या बांधकाम समितीचे अध्यक्ष कार्तिक पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी कार्यकारी संचालक आर.डी.माहुली,सचिव डी.एम.पाटील, मुख्य शेती अधिकारी प्रशांत पाटील, जनरल मॅनेजर विजय मोरे,जनरल मॅनेजर(उत्पादन) सुनिल सावंत, सिव्हील इंजिनिअर प्रेमनाथ कमलाकर प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्तिक पाटील म्हणाले,माजी मंत्री आ. जयंतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली या गळीत हंगामात १०८ दिवसात ६ लाख ८१ हजार ६५६ मेट्रीक टन



उसाचे गाळप करुन केले असून ७ लाख ५६ हजार ८४५ क्विंटल साखर पोत्यांचे उत्पादन घेतलेले आहे. येथे सरासरी साखर उतारा १२.६३ इतका मिळाला आहे.

प्रारंभी कार्यकारी संचालक आर.डी.माहुली यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. याप्रसंगी ऊस पुरवठा अधिकारी नितीन पाटील,संग्राम पाटील गटाधिकारी दिलीप पाटील,संग्राम पाटील, अभिजित कुंभार,विकास कदम,प्रणिल पाटील, अजित जाधव,सुनिल यादव यांच्यासह तोडणी, वहातूक मुकादम प्रामुख्याने उपस्थित होते. सचिव डी.एम.पाटील यांनी आभार मानले.

# ‘विवेकानंद’मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

स्वायत्त दर्जा प्राप्त झाल्यामुळे शिवाजी विद्यापीठाची गुणवत्ता शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मिळत नसतानाही येथील विवेकानंद महाविद्यालय दरवर्षी सुमारे पाच लाख रुपयांची गुणवत्ता शिष्यवृत्ती देत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत आहे. याच पार्श्वभूमीवर महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा उत्साहात पार पडला.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कला, क्रीडा, सांस्कृतिक, एन.सी.सी. व राष्ट्रीय सेवा योजना विभागात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तसेच शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त २०० हून अधिक विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोख पारितोषिक, प्रमाणपत्र, गौरवचिन्ह, ब्लेझर व ट्रॅकसूट देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी आदर्श विद्यार्थी श्रीशैल शिंदे, आदर्श विद्यार्थिनी प्राची मयेकर, आदर्श क्रीडा विद्यार्थी निकिती मगदूम व श्रीवर्धन पाटील, आदर्श सांस्कृतिक विद्यार्थी आर्यन अर्णे, आदर्श राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक प्रज्योत गायकवाड तसेच आदर्श एन.सी.सी. कॅडेट सायली वाडकर यांना शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

समारंभाची सुरुवात प्रतिमा पूजन व संस्था प्रार्थनेने झाली. प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. संजय थोरात यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील व प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले तर आभार डॉ. आरिफ महात यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.जे.जे.मगदूम अभियांत्रिकीमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**जयसिंगपूर : हॅलो प्रभात**

डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालय येथे ‘मृदगंध २०२६’ वार्षिक बक्षीस वितरण व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. प्रमुख अतिथी म्हणून हणमंतराव गायकवाड हे ऑनलाइन उपस्थित होते. तसेच रवींद्र वेल्हाळ,कोल्हापूरचे अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे, अभिनेत्री शिवाली परब, ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजयराज मगदूम, उपाध्यक्षा डॉ. सोनाली मगदूम, कार्यकारी संचालक डॉ. सुनील आडमुठे व प्राचार्या डॉ. शुभांगी पाटील आदी उपस्थित होते.



मान्यवरांनी विद्यार्थ्यांना कौशल्यविकास, चिकाटी व आत्मविश्वास यांचे महत्त्व पटवून दिले. वार्षिक अहवालात महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा सादर करण्यात आला.

यावेळी डॉ. जे. जे. मगदूम स्मृती बेस्ट आउटगोइंग पुरस्कार कु.ऋतुजा महाडिक (AI & DS विभाग) हिने पटकावला, तर डॉ. प्रभा जे. मगदूम बेस्ट अकॅडमिक एक्सलन्स पुरस्कार कु. साक्षी तिकोडे हिला प्रदान करण्यात आला. रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. प्राचार्या डॉ. शुभांगी पाटील व डीन स्टुडंट वेलफेयर प्रा. पी. पी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# शरद पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत यश

**यड्राव : हॅलो प्रभात**

येथील शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी आंतर इंजिनिअरिंग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे आयोजित विभागीय विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. वैयक्तिक क्रीडा प्रकारात मुलींनी बाजी मारली. लांब उडी व त्रिहेरी उडी स्पर्धेत दृष्टी वर्दे तर गोळाफेकमध्ये रेणुका कुंभ्राळकर हिने प्रथम क्रमांक पटकावला. भालाफेकमध्ये समृद्धी हजारी तर त्रिहेरी उडीमध्ये अनुष्का मगदूम यांनी उपविजेतेपद मिळविले. सांघिक खेळामध्ये मुलींच्या बुद्धिबळ संघाने उपविजेतेपद



मिळविले. या संघात पल्लवी बडवे, श्रद्धा सुतार, श्रावणी काटकर, स्नेहल टकले व श्रुती पाटील यांचा सहभाग होता.

मुलांच्या गटात रजा हमीद याने भालाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला, पारस भेंडवडे याने वेटलिफ्टिंग स्पर्धेत विजेतेपद पटकावले, तर लोकेश निकम हा उंचउडी स्पर्धेत उपविजेता ठरला.

या सर्व स्पर्धा गारगोटी येथे पार पडल्या. संस्थेचे अध्यक्ष आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर व एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना क्रीडा विभाग प्रमुख प्रा. सुयोग दानोळे, प्रा. एस. एस. चव्हाण तसेच इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले.

# कै.सुरेश बोरगे यांचा स्मृतिदिन सामाजिक उपक्रमांनी साजरा

**शाहुवाडी : हॅलो प्रभात**

येथील आदर्श शिक्षक कै.सुरेश दगडू बोरगे यांचा ११ वा स्मृतिदिन बोरगे कुटुंबीय व ग्रामस्थांच्या वतीने विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात बोरगे सर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करून



अभिवादन करण्यात आले. यानिमित्त जीवन शिक्षण विद्या मंदिर, साळशी येथील इयत्ता १ ली ते ७ वी विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली असून २१ विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ अभियानात तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल जीवन शिक्षण विद्या मंदिर शाळेचा विशेष सन्मान करण्यात आला. स्मृतिदिनानिमित्त विद्यार्थ्यांसह शिक्षक, कर्मचारी व ग्रामस्थांना प्रसाद वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्जुन जानकर यांनी केले तर आभार मुख्याध्यापकांनी मानले. यावेळी शिक्षक, अंगणवाडी कर्मचारी, जय शिवराय तरुण मंडळ व बोरगे कुटुंबीय उपस्थित होते.

# छ.शिवरायांचे विचार आचरणात आणावेत : पैगंबर शेख



**कडेगाव : हॅलो प्रभात**

राजमाता जिजाऊ याच छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुरू होत्या त्यांच्या शिकवणीतूनच शिवरायांनी मराठी साम्राज्याचा पाया रोवला छत्रपती शिवराय हे कोण्या एका धर्मासाठी लढले नसून अठरापगड जाती ज्यांच्यासाठी शिवरायांनी धर्मप्रमुख, राजप्रमुख, वतनदार यांच्याशी संघर्ष करून अठरापगड जातींना मानसिक, सामाजिक, आर्थिक गुलामगिरीतून मुक्त करून स्वातंत्र्याची फळे चाखण्याची संधी दिली. परस्त्री माते समान, शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये शेतकऱ्यांसाठी विविध धोरणे राबवणारे ते प्रथम शासक होते त्यामुळे त्यांचे दैवतीकारण न करता त्यांनचा जयकार करून पोवाडे गाऊन अठरा पगड जातींच्या मनांवर अधिराज्य गाजवणाऱ्या छत्रपती शिवरायांचे विचार आचरणात आणावेत हेच त्यांना अभिवादन असल्याचे प्रतिपादन शिव व्याख्याते पैगंबर शेख यांनी केले. ते कडेगांव येथे मातोश्री बायाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालयामध्ये शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य कणसे,प्राध्यापक देशमुख, नगरसेवक विजय शिंदे,माजी उपनगराध्यक्ष सागर सूर्यवंशी, स्वप्नील धर्मे, यश शिंदे,कुलभूषण शिंदे प्रमुख उपस्थित होते.

# हातकणंगले मतदारसंघात बीएसएनएलचे ७० नवे टॉवर मंजूर

## खासदार धैर्यशील माने यांच्या पाठपुराव्याला यश

**रुकडी : हॅलो प्रभात**

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील दुर्गम भागातील मोबाईल नेटवर्कची समस्या लवकरच मार्गी लागणार आहे. खासदार धैर्यशील माने यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे भारत संचार निगम लिमिटेडकडून (बीएसएनएल) सुमारे ७० हून अधिक नवीन मोबाईल टॉवरना मंजुरी मिळाल्याची माहिती त्यांनी दिली.

मतदारसंघातील शाहूवाडी व पन्हाळा तालुक्यांतील डोंगरी आणि दुर्गम वाड्या-वस्त्यांमध्ये नेटवर्कची मोठी अडचण निर्माण होत होती. विशेषतः मुंबईसह अन्य शहरांतून सुट्टीसाठी गावी येणाऱ्या चाकरमान्यांना संपर्क साधताना अडथळे येत होते. स्थानिक नागरिकांनी याबाबत खासदार माने यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला होता.



या पार्श्वभूमीवर खासदार माने यांनी देशाचे केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची भेट घेऊन नवीन टॉवर मंजुरीसाठी मागणी केली होती. त्यानंतर केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अखेर या प्रयत्नांना यश आले असून मतदारसंघात ७० हून अधिक टॉवर मंजूर करण्यात आले आहेत.

यामध्ये शाहूवाडी तालुक्यात ४२, पन्हाळा तालुक्यात ३४ (त्यापैकी १४ गावे हातकणंगले मतदारसंघातील), शिरोळ तालुक्यात ९ आणि हातकणंगले तालुक्यात ५ टॉवरचा समावेश आहे. या टॉवर उभारणीमुळे डोंगरी भागातील तसेच खेडोपाड्यांतील नागरिकांना अखंडित मोबाईल सेवा उपलब्ध होणार असून नेटवर्क समस्येवर मोठ्या प्रमाणात दिलासा मिळणार आहे, असा विश्वास खासदार माने यांनी व्यक्त केला.

# महापौर धीरज सूर्यवंशी यांचा थेट नागरिकांशी संवाद

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली महानगरपालिकेचे महापौर धीरज सूर्यवंशी यांनी शहरातील प्रभाग क्र. ७ मधील रमाई नगर परिसराला भेट देऊन नागरिकांशी थेट संवाद साधला.

या भेटीदरम्यान रमाई नगर येथील नागरिकांनी पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती, गटार व्यवस्था, स्वच्छता तसेच इतर मूलभूत सुविधांबाबतच्या प्रलंबित समस्या मांडल्या. मा. महापौरांनी नागरिकांच्या अडचणी शांतपणे ऐकून घेतल्या व केवळ समस्या ऐकून न थांबता संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना



दिल्या.

तसेच, प्रलंबित कामांचा आढावा घेऊन निश्चित कालावधीत काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. नागरिकांच्या समस्या सोडवणे हीच प्रशासनाची प्राथमिकता असल्याचे मा. महापौरांनी यावेळी नमूद केले. या प्रसंगी संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## थोडक्यात पण महत्वाचे



## गाडगे महाराज जयंती साजरी

**राहुरी : हॅलो प्रभात**

संत गाडगे महाराज यांची जयंती राहुरी शहरात विविध ठिकाणी उत्साहात साजरी करण्यात आली. गाडगे महाराज आश्रम शाळा परिसरातील त्यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. जयंतीनिमित्त आश्रम शाळेत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. त्यानंतर मूर्तीचे पूजन धुपदीप व पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. श्री. दिघे सर तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालय, देवळाली प्रवरा येथील छात्र-शिक्षक व शाळेतील कर्मचारी यांनी पूजन करून भजन व आरती केली. यावेळी विद्यार्थी व शिक्षकांनी संत गाडगे महाराज यांच्या स्वच्छता, शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती दिली. वळण येथील आश्रम शाळेत माजी मुख्याध्यापक सूर्यवंशी सर यांचे व्याख्यान झाले. नगरपरिषद व नगरपालिका शाळांमध्येही संत गाडगे महाराजांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

## साकेश्वर विद्यालयात निखिल गायकवाडचा सन्मान

**जामखेड : हॅलो प्रभात**



साकेश्वर विद्यालय, साकत येथे दहावी निरोप समारंभ कार्यक्रमावेळी इयत्ता सातवीतील विद्यार्थी निखिल गायकवाड याचा प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल प्रशस्तिपत्र व बक्षीस देऊन सन्मान करण्यात आला. सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षात निखिलचा प्रमुख पाहुणे श्रीकांत होशिंग यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला. विद्यालयाच्या वतीने राजकुमार थोरवे यांच्या हस्ते त्याला प्रशस्तिपत्र व बक्षीस प्रदान करण्यात आले. शाळेतील होतकरू व हुशार विद्यार्थी म्हणून निखिलने प्रथम क्रमांक मिळवत विद्यालयाचा नावलौकिक वाढविल्याबद्दल संस्थेने अभिमान व्यक्त केला. निखिल हा साकत गावातील आर. आर. घोडेस्वार यांचा नातू असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कार्यक्रमास विविध मान्यवर, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंबई पोलिसांच्या १२९० वाहनांचे लोकार्पण

**मुंबई : हॅलो प्रभात**

मुंबईत आणि महानगर परिसरात घडलेल्या गुन्ह्याच्या ठिकाणी जलद गतीने पोहोचणे, १०० आणि ११२ या हेल्पलाइन क्रमांकावर आलेल्या तक्रारीच्या कॉलवर विनाविलंब पोहोचणे यासाठी मुंबई पोलीस दलात १२९० नवीन वाहनांचा समावेश करण्यात आला आहे. नरिमन पॉईंट येथील मुरली देवरा चौकात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून आज या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाला गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सह आयुक्त (प्रशासन) एस. जयकुमार यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी उपस्थित होते. या वाहनांमध्ये ६५७ दुचाकी ६३३ चार चाकी वाहनांचा समावेश आहे. चार चाकी वाहनांमध्ये स्कॉर्पिओ आणि मोठी अर्मेनिया वाहने आहेत. सध्या मुंबई पोलिसांचा हेल्पलाइनवर आलेल्या तक्रारीचा प्रतिसाद वेळ ५.३० मिनिटे आहे. हा प्रतिसाद वेळ या वाहनांच्या समावेशामुळे निश्चितच आणखी कमी होणार आहे. गुन्ह्याची जलद गतीने उकल करून पीडितांना तातडीने न्याय देणे या वाहनांमुळे शक्य होणार आहे. मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत एकूण ९० पोलीस स्टेशन कार्यरत आहेत. या प्रत्येक पोलीस स्टेशनला पाच दुचाकी, चार स्कॉर्पिओ आणि मोठी अर्मेनिया वाहने एक अशाप्रकारे एकूण दहा वाहने देण्यात येणार आहेत. ही चार चाकी वाहने मोबाईल डाटा टर्मिनल, जीपीएस यंत्रणा, व्हेईकल ट्रेकिंग यंत्रणा आधी आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त आहेत.

## व्यंकोजी खोपडे यांनी केला १५ लाख सरकारी निधीचा गैरव्यवहार

**पुणे : हॅलो प्रभात**



पुणे महापालिकेत नव्याने निवडून आलेले भाजपचे नगरसेवक व्यंकोजी खोपडे यांच्यावर उद्धवसेनेचे वसंत मोरे यांनी गैरव्यवहाराचे आरोप केले आहेत. जिल्हा परिषद आणि महापालिका आयुक्त यांना याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे. महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट केलेल्या गुजरवाडी-निंबाळकरवाडी या गावाचे सरपंच असताना खोपडे यांनी ग्रामपंचायतीला मिळालेल्या निधीत गैरव्यवहार केला आहे, असा आरोप उद्धवसेनेचे वसंत मोरे यांनी पत्रकार परिषदेत केला. या ग्रामपंचायतीच्या २०१७ ते २०२१ या कालावधीत खोपडे यांनी दस्तनोंदणीच्या माध्यमातून राज्य सरकारकडून मिळणारा मुद्रांक शुल्काचा परतावा, जिल्हा परिषदेकडून मिळणारा विकास निधी, ग्रामपंचायतीला मिळालेले कराचे उत्पन्न, गावाच्या हद्दीतील व्यावसायिक शेडकडून वसूल केला जाणारा कर असे सुमारे ३ कोटी ४९ लाख रुपये उत्पन्न जमा झाले होते. या ग्रामपंचायतीचे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खाते आहे. त्यावरून मोठ्या प्रमाणावर चेकद्वारे रकमा दिल्या गेल्या आहेत. यामध्ये या ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्याचे कुटुंबीय, कर्मचारी, उक्त काम करणारी एक व्यक्ती, तिच्याकडील कर्मचारी यांच्या नावाने चेक दिले गेले. यात खोपडे यांनी गैरव्यवहार केला. खोपडे हे संचालक असलेल्या ज्ञानदा अर्थमुव्हर्स या संस्थेलाही धनादेश दिले आहेत. हे गाव महापालिकेत समाविष्ट होण्यापूर्वी दोन दिवसांआधीच १५ लाख रुपयांहून अधिक रक्कम ग्रामपंचायतीच्या खात्यातून वर्ग केली गेली आहे, असा दावा मोरे यांनी केला आहे.

# 'नेट-सेट व संशोधन प्रकल्प' कार्यशाळा उत्साहात



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

श्री सद्गुरु गंगागीर महाराज कॉलेज, कोपरगाव येथील वाणिज्य व व्यवस्थापन विभाग, बीबीए विभाग, करिअर काउन्सेलिंग अँड प्लेसमेंट सेल तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने "क्षेत्रीय संशोधन व संशोधन प्रकल्प तयारी आणि नेट-सेट तयारी" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. कार्यशाळेत नेट-सेट परीक्षेची तयारी व संशोधन प्रकल्पाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. सागर मोरे यांनी परीक्षेचे स्वरूप, अभ्यासाचे नियोजन, योग्य मार्गदर्शनाचे महत्त्व तसेच पेपर १ व पेपर २ ची तयारी याबाबत माहिती दिली. योग्य संदर्भग्रंथांची निवड, नियमित सराव आणि सातत्यपूर्ण अभ्यास यावर त्यांनी विशेष भर दिला.

संशोधन प्रकल्प करताना विषय निवड, उद्दिष्टे निश्चिती, माहिती संकलन पद्धती आणि प्रकल्प अहवाल लेखनातील आवश्यक बाबी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. दुसऱ्या सत्रात प्रा. अर्जुन भगवत यांनी संशोधन पद्धतीचे महत्त्व, आवश्यक टप्पे, आराखडा तयार करण्याची पद्धत आणि सादरीकरणातील बारकावे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी विविध शंका उपस्थित करून त्यांचे निरसन करून घेतले.

प्राचार्य डॉ. एम. टी. सरोदे यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी संशोधनवृत्ती जोपासून नियोजनबद्ध व सातत्यपूर्ण अभ्यास करावा, असे आवाहन केले. प्रामाणिकपणा, अचूक माहिती संकलन आणि योग्य संदर्भांचा वापर यावर त्यांनी भर दिला. अशा कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून करिअरला दिशा मिळते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रतीक्षा संवत्सरकर व प्रा. मयुरी देवकर यांनी केले, तर आभार प्रा. दिलीप भोये यांनी मानले.

## पंचायत राज सदस्यांची भारतीय हवामान विभागात सहल

**जुन्नर : हॅलो प्रभात**



चाईल्ड फंड इंडिया या स्वयंसेवी संस्थेतर्फे बुधवार दिनांक २५/०२/२०२६ रोजी पंचायत राज प्रतिनिधी, विद्यार्थी व शिक्षकांसाठी पुणे येथील भारतीय हवामान विभाग आणि केंद्रीय कृषी वेधशाळा येथे अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले. ही सहल उत्साहात व यशस्वीरित्या पार पडली. या सहलीत शितळेश्वर विद्यालय, सितेवाडीचे मुख्याध्यापक श्री. संतोष हांडे सर व इयत्ता नववीतील सहा विद्यार्थिनी सहभागी झाल्या. तसेच सितेवाडी ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. दिपालीताई पाटेकर, मढ हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. राणे सर व सौ. राणे मॅडम, मढ ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. मस्करे ताई, पारगाव ग्रामपंचायतचे सरपंच श्री. दत्तात्रय ढेंगळे, खुबी-करंजाळे ग्रामपंचायतचे सरपंच श्री. विजय काठे, देवळे ग्रामपंचायतचे सरपंच दिपक घुटे यांच्यासह सदस्य, शेतकरी प्रतिनिधी, पेसा प्रतिनिधी तसेच ओडिशा येथील संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते. जुन्नर येथील संस्थेच्या कार्यालयातील सौ.मुक्ता गिरी, अजित सौर, प्रविण जगताप व त्यांचे सहकारीही यावेळी उपस्थित होते. सहभागी मान्यवरांनी वेधशाळेतील हवामान अंदाज प्रक्रिया, पर्जन्यमान मोजणी यंत्रणा, तापमान नोंद पद्धती तसेच शेतीसाठी उपयुक्त हवामान मार्गदर्शन याबाबत सविस्तर माहिती घेतली. या अभ्यास सहलीचे नियोजन व मार्गदर्शन संस्थेचे वरिष्ठ अधिकारी अभिजित मदने व पूनम मिश्रा यांनी केले. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना हवामानशास्त्राची प्रत्यक्ष माहिती मिळाली तसेच शेतकऱ्यांना शेती नियोजनासाठी उपयुक्त मार्गदर्शनमिळाले.

## आ. सुधीरदादा गाडगीळ यांच्या कार्यालयात वि. दा. सावरकर यांना अभिवादन



**सांगली : हॅलो प्रभात**

स्वा. विनायक दामोदर सावरकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आमदार सुधीरदादा गाडगीळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सावरकरांच्या राष्ट्रवादी विचारांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास राज्य परिषद सदस्य प्रकाश बिरजे, ज्येष्ठ नेते श्रीकांत शिंदे, माजी नगरसेवक विनायक सिंहासने यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाराष्ट्र प्रदेश झोपडपट्टी सुरक्षा दलाची बारामती शहर कार्यकारिणी जाहीर

### महिला आघाडीला प्राधान्य

**बारामती : हॅलो प्रभात**

बारामती शहरातील सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र प्रदेश झोपडपट्टी सुरक्षा दल या संघटनेच्या बारामती शहर कार्यकारिणीची घोषणा रविवारी (दि. २२ फेब्रुवारी २०२६) करण्यात आली. कसबा बारामती येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात झालेल्या कार्यक्रमात नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले.

ही निवड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भगवानराव वैराट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. नव्या कार्यकारिणीत युवकांसह महिलांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. नवीन कार्यकारिणीत शहर अध्यक्षपदी केदार पाटोळे, शहर उपाध्यक्षपदी अन्वर (बबलू) शेख, युवक अध्यक्षपदी दत्तात्रय खरात तर कार्याध्यक्षपदी अजय खरात यांची निवड करण्यात आली. महिला आघाडीच्या शहराध्यक्षपदी जयश्रीताई कसबे, सचिवपदी लक्ष्मीताई जगताप व कार्याध्यक्षपदी संगीता (ज्योती) सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कार्यक्रमास पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष महंमद शेख, पुणे जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय डाडर, जिल्हा उपाध्यक्ष दत्ता बाबर, माजी



शहराध्यक्ष दशरथ मांढरे व सोमनाथ पाटोळे उपस्थित होते. यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांना सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. संघटनेच्या माध्यमातून झोपडपट्टीधारक व कष्टकरी जनतेचे प्रश्न सोडवणे, तसेच महिलांच्या सुरक्षिततेसाठी विशेष प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही नूतन कार्यकारिणीने दिली. या निवडीचे शहरात सर्वत्र स्वागत होत आहे.

# कोपरगाव नगरपरिषदेच्या वित्तीय अंदाजपत्रकास बहुमताने मंजुरी

### नगरपरिषदेची रुग्णवाहिका येणार; आरोग्यसेवेसाठी ठरणार उपयुक्त

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

कोपरगाव नगरपरिषदेच्या वित्तीय वर्ष २०२६-२७ अंदाजपत्रकास मंजुरी देण्याचा एकच विषयासाठी सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती.पालिकेकडून अतिशय महत्वाचे निर्णय घेण्यात आलेले आहेत त्याबद्दल सकारात्मक चर्चा होऊन सभा पार पडली.स्वच्छतेच्या बाबतीत काम होते आहे मात्र अधिकच्या दर्जेदार सुधारणा पुढील महिन्यात दिसू लागतील तसेच ढापे दुरुस्ती,किरकोळ कामे आणि मुख्यत्वेकरून काही रस्त्यांचा कामाला सुरुवात करण्यापूर्वी पाईपलाईनचे काम पूर्ण करून घेण्यावर भर आहे कारण रस्ते झाल्यानंतर पुन्हा नवीन रस्ते खोदून पाइपलाइन केल्यास नुकसान जनतेच्या पैशाचे होते



व कामेही खराब होतात त्यामुळे काही काळात हा प्रश्न सोडवला जाईल अशी भूमिका नगराध्यक्ष पराग संधान यांनी मांडली आहे.

पाण्याच्या बाबतीत तीस ते चाळीस टक्के कामकाज पूर्ण केले त्यातच स्वच्छ पाणी शहराला येऊ लागले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी स्नेहलता कोल्हे, विवेक कोल्हे यांच्यासमवेत भेट घेतली व चर्चा केली होती त्यानुसार येत्या काही दिवसात शंभर टक्के शास्ती माफीचा निर्णय होणार आहे. जनतेला अपेक्षित कामे पालिकेचे आर्थिक स्थिती सांभाळून पूर्ण करण्यावर भर असून मागील काही सुधारणा करण्यात अधिकचा वेळ द्यावा लागतो आहे.पत्रकार बांधवांना प्रवेश न देण्याचा कुठलाही विचार नसून जे निर्णय सर्वसाधारण सभेमध्ये होतात ते जनतेसमोर आम्ही मांडत असतोच मात्र सध्या नगरपरिषदेत पत्रकार व्यवस्था होण्यासाठी जागेची कमतरता आहे आणि सर्वच पत्रकारांना जागा उपलब्ध करून देणे शक्य नसल्याने दुजाभावाची भावना होऊ नये यासाठी आम्ही जी चर्चा आणि निर्णय होतात ते मांडण्याच्या दृष्टीने सकारात्मक असतो.नवीन इमारतीत स्थलांतर झाल्यानंतर सर्वच पत्रकारांना आसन व्यवस्था उपलब्ध होणे शक्य होणार आहे ते पर्यंत सहकार्य अपेक्षित आहे अशी स्पष्ट भूमिका नगराध्यक्ष पराग संधान यांनी मांडली आहे. विश्वासनामा पूर्ण करण्याच्या दृष्टीने आमचे कामकाज सुरू असून पालिकेच्या मालकीची स्वतःची रुग्णवाहिका लवकरच घेतो आहोत जी नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने मोलाची ठरणार आहे.कुंभमेळ्याच्या धर्तीवर गोदावरी तट सुशोभीकरण, रिटेनिंग वॉल अशी अनेक कामे होण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे मागणी केलेली आहे. यावेळी उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर,सर्व नगरसेवक,पालिका अधिकारी उपस्थित होते.

## नागीणविषयी जागरूकतेचा अभाव; डॉक्टरांशी चर्चा नाहीच

**मुंबई : हॅलो प्रभात**



नागीण (शिंगल्स) हा वेदनादायक आजार असूनही भारतातील सुमारे निम्मे प्रौढ त्याच्या प्रतिबंधाबाबत डॉक्टरांशी चर्चा करत नाहीत, अशी धक्कादायक बाब एका जागतिक सर्वेक्षणातून समोर आली आहे. ५० वर्षांवरील आणि दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त प्रौढांवर नागीणीचा मोठा परिणाम होत असल्याचेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

नागीण कृती सप्ताह (२३ फेब्रुवारी–१ मार्च २०२६) निमित्त करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात नागीण झालेल्या ४३% भारतीयांनी दैनंदिन जीवनात अडथळा आणणारी तीव्र वेदना अनुभवली असल्याचे सांगितले. तर तीनपैकी एका व्यक्तीने या आजारामुळे काम किंवा सामाजिक कार्यक्रमांपासून दूर राहावे लागल्याचे नमूद केले. मूत्रपिंडाचे आजार (सीकेडी) आणि हृदयविकार (सीव्हीडी) असलेल्या रुग्णांमध्ये नागीणीचा सर्वाधिक परिणाम दिसून आला.

नागीण हा व्हेरिसेला-झोस्टर विषाणूमुळे होणारा आजार असून वय वाढल्यास रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे त्याचा धोका वाढतो. हा आजार प्रामुख्याने शरीराच्या एका बाजूला पुरळ आणि वेदनादायक फोडांच्या स्वरूपात दिसून येतो. तज्ज्ञांच्या मते, नागीण टाळण्यासाठी लसीकरण हा प्रभावी उपाय आहे.

## 'तपास अतिशय वेगाने सुरु', सीआयडीने दिली फक्त एवढीच माहिती

**पुणे : हॅलो प्रभात**

पुण्यात मागील महिन्यात २८ जानेवारीला अजितदादांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्यासोबत ५ लोकांनीही जीव गमावला. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. महाराष्ट्राचा धुरंधर नेता गमावल्याने तो दिवस नागरिकानासाठी काळा ठरला आहे. या अपघाताबाबत आमदार रोहित पवार यांनी अनेक सवाल उपस्थित केले आहेत. त्यांनी पुरावे दाखवत डीजीसीए आणि व्हीसीआर कंपनीवर निशाणा साधला आहे. अजित पवारांच्या विमानाचा अपघात झाला की घातपात झाला त्याची माहिती जनतेसमोर आली पाहिजे. DGCA कडून मंगळवारी एक अहवाल आला. त्यात VSR कंपनीतील त्रुटी समोर आल्यानंतर DGCA ने या कंपनीची लिअरजेट विमाने उड्डाण करण्यास बंदी आणली. मात्र त्या अहवालातही या कंपनीला वाचवण्याचा अप्रत्यक्ष प्रयत्न करण्यात आला. VSR कंपनी चूक असेल तर DGCA चीही चूक आहे. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. VSR कंपनीच्या मालकाला अटक केली पाहिजे अशी मागणी आमदार रोहित पवारांनी केली आहे. तसेच सरकार याकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे रोहित पवारांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आहे.

# पाणीपट्टी वाढीचा निर्णय रद्द करा : पल्लवी ढूस

### ६ मार्चपासून आंदोलनाचा इशारा

**देवळाली प्रवरा : हॅलो प्रभात**

देवळाली प्रवरा नगरपरिषदेकडून पाणीपट्टी १८०० रुपयांवरून थेट ३००० रुपये करण्यात आलेली वाढ तात्काळ रद्द करावी, अन्यथा ६ मार्चपासून नगरपरिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नगरसेविका पल्लवी वैभव ढूस यांनी दिला आहे.

नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, अहिल्यानगर जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच हेमंत ओगले यांना दिलेल्या निवेदनात ढूस यांनी म्हटले आहे की, नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत विषय क्रमांक २० अंतर्गत नागरिकांना विश्वासात न घेता पाणीपट्टीत वाढ करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. या निर्णयामुळे शहरातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून मध्यम व अल्प उत्पन्न गटावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे.

पाणीपुरवठा योजना 'नो लॉस, नो प्रॉफिट' तत्त्वावर चालवावी, यासाठी नगरपरिषदेनं प्रथम पाणीपुरवठा योजनेवरील वीजबिलाचा खर्च कमी करून सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करावा, अशी मागणी त्यांनी केली



आहे. तसेच मुळा धरण ते देवळाली प्रवरा मुख्य पाइपलाईनवरील गळती व अनधिकृत नळजोडण्यांमुळे होणारी पाण्याची नासाडी रोखून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

याशिवाय पाणीपुरवठा विभागातील आस्थापना खर्च कमी करण्यासाठी ठेका पद्धत बंद करून स्वतंत्र पदनिर्मिती करावी किंवा वितरणाचे ऑटोमेशन करावे, तसेच पाणीपट्टीतून जमा होणारा निधी इतरत्र खर्च करणाऱ्या जबाबदार अधिकारी-पदाधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

मूलभूत सेवा म्हणून पाणीपुरवठा किफायतशीर व न्याय्य दरात उपलब्ध करून देणे हे नगरपरिषदेचे कर्तव्य असल्याचे नमूद करत अवाजवी वाढीचा ठराव रद्द न केल्यास ६ मार्च २०२६ रोजी धरणे आंदोलन करण्यात येईल, असे ढूस यांनी स्पष्ट केले आहे.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५000/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७000/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १0000/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळविण्यासाठी संपर्क : 9021651976